# प्र क र ण  ति स रे

## संत विचारात राष्ट्र, राष्ट्रवाद व राष्ट्रबांधणी

## प्रकरण तिसरे

## संघविचारात राष्ट्र, राष्ट्रवाद व राष्ट्रबांधणी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी १९२५ मध्ये विजयादशमी दिवशी केली. संघ स्थापनेमागील हेतू हिंदूंना संघटीत करणे तर होताच परंतु सर्वच हिंदूंना राष्ट्रवादाबाबत जागृत करून राष्ट्रपुनर्निर्माण करणे हा होता.

संघाचे उद्दिष्ट राजसत्ता मिळविणे हे नसून समाजाच्या व पर्यायाने राष्ट्राच्या अवनतीची, कारणे दूर करणे हे आहे. हिंदूंची प्रबळ अशी संघटना उभी करणे संघाचे ध्येय राहिले आहे. संघाचे उद्दिष्ट मो.ग.तपस्वी यांनी "युगप्रवर्तक संघ" यामध्ये स्पष्ट सांगितले आहे; "फारसे कोणतेही सायास घ्यावे न लागता या हिंदुस्थानात देशासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची भावना सहज फुंकर घालून पेटविता येईल असा समाज "हिंदू" हाच आहे आणि जेव्हा जेव्हा हिंदू समाजात "आधी देश, मग मी" ही भावना लोप पावली तेव्हा तेव्हा या देशाचे पतन झाले. म्हणून सर्व वाद बाजूला ठेवून त्यांनी हिंदू समाजाला हिंदुस्थानसाठी जगण्याचे आणि त्यासाठीच मरण्याचे संस्कार देण्याचे ठरविले. हेच संघाचे वैचारिक अधिष्ठान आहे म्हणूनच ७० वर्षे झाली तरी इतक्या फोफावून

नंतर कोसळलेल्या "समाजवाद", साम्यवाद, भांडवलवाद, यांच्या पालोवर संघवाद या देशात निर्माण झालेला नाही."[१]

संघ हा धा-या अर्थाने स्वातंत्र्योत्तर काळातच जोमाने वाढला गरजेप्रमाणे संघाने विविध संघटना विविध क्षेत्रात स्थापन केल्या. संघाच्या ७१ वर्षाच्या कारकीर्दीत चार सरसंघचालकांनी संघाची धुरा सांभाळलेली आढळते. १९२५ ते १९४० पर्यंत डॉ. हेडगेवार हे सरसंघसंचालक होते. त्यानंतर १९४० ते १९७३ पर्यंत म्हणजे जवळजवळ ३३ वर्षे मा.स.गोळवलकर गुरुजी सरसंघचालक होते. व त्यानंतर १९७३ ते १९९४ पर्यंत बाळासाहेब देवरसांनी सरसंघचालक म्हणून पदभार सांभाळला. व १९९४ ते आजपर्यंत राजेंद्रसिंह उर्फ रज्जुभैय्या हे सरसंघचालकपदाचा कार्यभार सांभाळत आहेत.

मानवी जीवनाशी संबंधित विविध क्षेत्रात संघाच्या संलग्न संघटना पसरलेल्या आहेत. म्हणून या संघटना व संघ मिळून "संघ परिवार" बनतो. या संलग्न संघटना, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, कामगार, शेतकरी, सामाजिक, सांस्कृतिक, वनवासी, आरोग्य,प्रकाशन, पत्रकारिता, महिला, इत्यादी क्षेत्रात कार्य करीत आहेत. व ही कार्ये सेवाभावीवृत्तीने समाजाला उपयोगी पडेल या ध्येयाने करीत आहेत. तसेच या संलग्न संघटनांमध्ये काही मतभेद झाले तर समन्वय साधण्यात संघ महत्त्वाची भूमिका बजावत असतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या सर्व संघटनांची जननी आहे.

कारण या सर्व संघटना संघाच्या प्रेरणेमुळेच तयार झालेल्या व वाढलेल्या आहेत. तसेच संघाने या संघटनांना त्यांच्या कार्यासाठी वेळोवेळी स्वयंसेवक पुरविले आहेत.

## संघाच्या तत्वज्ञानातील राष्ट्र संकल्पना

संघाचे प्रचारक व जनसंघाचे अध्वर्यू पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची राष्ट्राची संकल्पना राष्ट्र हे जीवमान अस्तित्व आहे असे सांगते. "राष्ट्राची भूमी आणि त्या भूमीत पिढ्यान पिढ्या पुत्रत्वाने नांदत असलेला जनसमूह हे त्या राष्ट्राचे शरीर होय. आपल्या येथील प्राचीन परिभाषेत याला "देश" अशी संज्ञा आहे. या जनसमूहाची इच्छा म्हणजे सामूहिक जीवनाचा संकल्प हे त्या राष्ट्राचे मन होय. तिसरी गोष्ट म्हणजे या समाजाचे, राष्ट्राचे जीवन नीट चालावे यासाठी म्हणजेच त्याची धारणा करण्यासाठी काही नियम असतात. काही व्यवस्था असतात. या नियम व्यवस्था म्हणजे त्या राष्ट्राचे जीवनध्येय वा जीवनहेतू हा त्या राष्ट्राचा आत्मा होय. या चारांच्या रसायनामधून राष्ट्र उभे राहते. थोडक्यात असे म्हणता येईल की, ज्याप्रमाणे शरीर, मन, बुध्दी व आत्मा मिळून समग्र व्यक्ती बनते त्याचप्रमाणे देश [भूमी,जन] सामूहिक संकल्प, धर्म व जीवनध्येय मिळून राष्ट्र तयार होते." [२]

"संघाची हिंदुत्वाची भूमिका राष्ट्रीयतेची आहे. या देशात एक जन [ People ] आहे.

त्यांची संस्कृती एक आहे आणि म्हणून त्यांचे एक राष्ट्र आहे आणि ते हिंदूराष्ट्र आहे अशी संघाची भूमिका आहे." [३]

"राष्ट्रीय भावनेचे पोषण करण्याचे कार्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघ १९२५ सालापासून करीत आला आहे राष्ट्र आणि राष्ट्राची संस्कृती यासंबंधी नितांत प्रेम हे त्याचे ध्येय आहे. भारत ही आपली माता आहे. ती कुरुप, अज्ञानी अथवा अन्यप्रकारे दोषापूर्ण असली तरी पृथ्वीतळावर तिच्या प्रेमाला मोजमाप नाही. हीच आमची भावना आहे त्याबाबतीत कोणतीही तडजोड होऊ शकत नाही. अशा मूलभूत गोष्टींवर तडजोड म्हणजे राष्ट्राचा विनाशच होय असे आम्ही मानतो. शुध्द राष्ट्रीयत्वाची ही ज्योत प्रत्येक हृदयात प्रज्वलीत करुन अशा प्रज्वलीत अंत:करणांना प्रेमाच्या सूत्रात गुंफण्याचे पवित्र व्रत संघाने घेतले आहे. आपला भारत म्हणजे एक अखंड विराट राष्ट्रपुरुषाचे शरीर आहे.त्याचे आपण लहान लहान अवयव आहोत. शरीराच्या अवयवांप्रमाणे परस्परांत प्रेमभाव ठेवून राष्ट्रशरीर एकसंघ राखू, हाच एकमात्र पवित्रभाव आपल्या कार्यात निहित आहे. हे आमचे राष्ट्र म्हणजे जणू परमेश्वराचेच प्रकट रुप आहे व ते आपल्याकडून पूजेची मागणी करीत आहे. भारतीयत्वाची हीच अनुभूती आहे." [४]

"या प्रकारे ज्या समाजात अंतर्बाह्यएकरुपता आहे. आंतरिक म्हणजे, गुण, धर्म, श्रध्दा, तत्वज्ञान आदींची एकरुपता आणि बाह्य म्हणजे समानशत्रू मित्रभाव, समान सुख दु:खभाव आणि समान हानीलाभ भाव, अशा समाजाला राष्ट्र म्हणतात.

या दृष्टीने आपले हे राष्ट्र आहे. या प्रकारची भक्ती मातृभूमीविषयीच्या श्रद्धेतूनच निर्माण होऊ शकते. म्हणून या भक्तीचा साक्षात्कार प्रत्येकाला घडविण्याचा आपला संकल्प आहे. या राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पण करण्याची वृत्ती प्रत्येक व्यक्तीत जागृत व्हावी हे आपले उद्दिष्ठ राष्ट्रभावना जागृत करून त्याच्या आधारावर आपल्याला कार्य करावयाचे आहे. आणि याच आधारावर समाजाचे जीवन निर्माण होऊ शकते."[५]

पं.दीनदयाळ उपाध्यायांनुसार, "जेव्हा एका समुदायापुढे एक जीवितकार्य, एक विचार व आदर्श असतो तो समुदाय भूमीविषयी चित्तांत मातृभाव ठेवतो त्यासच राष्ट्र म्हणता येईल. यातील एकाही गोष्टीचा अभाव असेल तर तो समुदाय राष्ट्ररूप होणार नाही."[६]

"प्रत्येक गोष्ट मान्य अथवा अमान्य करण्याचे मोजमाप म्हणजेच चिती व हीच राष्ट्राचा आत्मा आहे. याच आत्म्याच्या आधारावर राष्ट्र उभे राहते व हाच आत्मा राष्ट्रातील प्रत्येक श्रेष्ठ व्यक्तीच्या आचरणातून प्रकट होत असतो."[७]

उपाध्याय पुढे म्हणतात, "भारतीयांनी राज्य हेच राष्ट्राचे एकमेव प्रतिनिधी आहे असे कधीच मानले नाही त्यामुळे राज्य नष्ट झाले तरी राष्ट्र नष्ट झाले नाही. इराणमध्ये राज्य नष्ट झाल्यावर इराण हे राष्ट्र नष्ट झाले. परंतु भारतात राज्यास अनेक वेळा गुलामी पत्करावी लागली राजकीयदृष्टया दिल्लीच्या गादीवर कधी पठाण, कधी तुर्क, मोगल, इंग्रज हे बसले. परंतु त्यांनतरही आपले राष्ट्र जिवंत राहिले. याचे कारण आपल्या जीवनाचे केंद्र राज्य

नव्हते. जर राज्य हेच जीवनाचे सर्वस्व आपण मानले असते तर आपण केव्हाच नष्ट होऊन गेलो असतो."[८]

"राष्ट्राच्या रक्षणासाठी राज्य निर्माण होते. तसेच राष्ट्राचे आदर्श आचरणात आणण्यासाठी आवश्यक ती परिस्थिती तयार करण्यासाठी राज्य निर्माण होते. राष्ट्राचा आदर्श चिती होय. चिती खोल गहन आहे. चितीची अभिव्यक्ती व व्यवहाराचे नियम म्हणजेच राष्ट्राचा धर्म होय. म्हणून धर्म ही अत्यंत महत्वाची बाब आहे. आपला प्राण धर्मामध्ये आहे. धर्म सुटला तर प्राण गेला. यासाठी ज्यांनी धर्म सोडला ते राष्ट्रापासून च्युत झाले व त्यांचे सर्वस्व गेले."[९]

"राष्ट्र ही लोक आणि त्यांच्या भावना यासंबंधीची संकल्पना आहे. लोक आणि त्यांच्या भावना यामागे, त्या लोकांचा इतिहास, त्यांचे सुख दुःखाचे समान अनुभव, बऱ्यावाईटाचे समान मापदंड, समान जीवनमूल्ये असतात. हा एक प्रकारे अतीताचा भाग आहे. राष्ट्राच्या संकल्पनेत वर्तमानाच्याशी संबंध असतो. त्या लोकांना आपण एकत्र राहावे असे वाटले पाहिजे आणि भूतकाळात जे केले त्याच्या पुढे जाऊन नवे करण्याची अभिलाषा त्यांना असली पाहिजे. अशा अतीत आणि वर्तमान यांच्या समन्वयाने राष्ट्र बनत असते. अगदी संक्षेपाने सांगायचे म्हणजे, संस्कृती हा या राष्ट्रत्वाचा आधार असतो. भाषा, आदी बाकीचे घटक या आधाराला मजबूत करीत असतात."[१०]

हिंदू राष्ट्राबाबत स्पष्टीकरण करताना मा.गो.वैद्य म्हणतात, "इतिहासाच्या प्रक्रियेत या संस्कृतीला हिंदू संस्कृती असे अभिधान प्राप्त झाले आहे. म्हणून हे हिंदू राष्ट्र आहे. एका राष्ट्रात अनेक उपासना संप्रदाय राहू शकतात. सर्वांना उपासनेचे मुक्त स्वातंत्र्य हा तर हिंदू समाजाचा अनन्यसाधारण असा विशेष आहे. उपासना संप्रदाय बदलला की संस्कृती बदलली पाहिजे असे नाही. येथील ख्रिश्चनांनी त्याप्रमाणे क्लाइव्ह व डलहौसी यांचा अभिमान बाळगू नये. तसेच मुसलमानांनी घोरी आणि गझनवी यांचा अभिमान धरू नये. आणखी एक गोष्ट आवश्यक आहे ती म्हणजे, सर्व उपासना - संप्रदायांविषयी समान आदराची भावना. सर्व उपासना संप्रदायांना स्वातंत्र्य आहे. मला वाटेल तसा हात हलविण्याचे स्वातंत्र्य आहे. पण ते कुठपर्यंत ? दुसऱ्याच्या नाकाला ठोसा लागणार नाही, इथपर्यंत ! ख्रिस्ती, इस्लामी संप्रदायांच्या अनुयायांनी ही मर्यादा लक्षात घेतली पाहिजे म्हणजे मग धर्मपरिवर्तनाच्या प्रयत्नांना कुठे थांबवावे हे त्यांना समजून येईल. सर्व धर्म समभाव याचा हा अर्थ आहे. विशिष्ट संप्रदायाचे अनुयायी हे स्वर्गाचे अधिकारी आणि बाकी नरकाचे हे असहिष्णूद्वैत या देशाच्या संस्कृतीशी म्हणजेच राष्ट्रीशी विसंगत आहे. ख्रिस्ती आणि मुसलमानांनी या प्रकारे खऱ्या अर्थाने सर्वधर्मसमभाव स्वीकारला की, हे हिंदूराष्ट्राचे निष्ठावंत घटक बनले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची हिंदूराष्ट्राची ही संकल्पना आहे."[११]

"राष्ट्र हा केंद्रबिंदू न ठेवल्यामुळे गोंधळ झाला. लोक व्यक्तिनिष्ठ विचार करू लागले. आपणाला आर्थिक विकासाच्या दृष्टीने काम करावयाचे आहे असेही सांगितले आहे. आर्थिक विकास कोणाचा करावयाचा ? व्यक्तीचा म्हणून त्यांच्या राहणीचा दर्जा वाढविण्याचा विचार त्या बरोबरच आला. राष्ट्राचे राष्ट्राभिमान वाढले की व्यक्तीचे वाढेल असा विचार मांडला गेला नाही आज गरज आहे ती आपल्या जीवनाचा ध्येयबिंदू जर कळला तर सर्व लोक त्या दिशेने जाऊ लागतील. त्या ध्येयाकडे पोहोचण्यासाठी मार्ग वेगवेगळे असू शकतील, पण हे राष्ट्र आमचे आहे, हा आमचा देश आहे, हा विचार आज सर्वात महत्त्वाचा आहे. एकदा राष्ट्रदेवतेच्या मंदिराकडे जावयाचे हे ठरल्यावर बाकी गोष्टींचा मेळ त्या ध्येयसाधनेसाठी घातला जाईल."[१२]

" राष्ट्र म्हणजे काय ? भारत म्हणजे येथील केवळ नद्या, पर्वत काय ? आपण भारताचा विचार म्हणजे त्यातील समाजाचा विचार असे मानतो. पण आपण सर्वजण राष्ट्रासाठी विचार करू असे जेव्हा म्हणतो तेव्हा ही भावना अंतरीची असते. आपण इंग्रजांविरुद्ध लढत होतो ते याच अंतरीच्या ऊर्मीने. इंग्रज गेल्यावर आपले राज्य चालविण्याची जबाबदारी आपल्यावर आली. पण आम्ही म्हणजे कोण ? याचा गंभीरपणे विचार त्या काळात झाला नाही. इंग्रज गेल्यावर आपल्याला राज्य मिळाले पण आपले राज्य म्हणजे कोणाचे राज्य ?

या देशाचा वंशाकुर कोणता ? या देशातील राष्ट्रजीवन कोणी निर्माण केले ? आपण एका सत्याचा स्वीकार केला पाहिजे ते: हे की, आमचे राष्ट्रजीवन हिंदू राष्ट्रजीवन आहे. आणखी कोणी येऊन आले तर त्यांना या हिंदू राष्ट्रजीवनाशी जुळून घ्यावे लागेल." [१३]

" हिंदू ही धार्मिक संकल्पना नसून एक सांस्कृतिक धारणा आहे, असे संघ म्हणतो. म्हणजे या हिंदुस्थानाची जी एक अनादि काळापासून चालत आलेली संस्कृती आहे. जिच्यामुळे हिंदुस्थान हा हिंदुस्थान म्हणून आजही जिवंत आहे. तिला जो जो आपली संस्कृती मानतो तो तो सारा हिंदूच आहे, त्याची पूजापद्धती कोणतीही असो, त्याचा देव कोणताही असो, त्याचा धर्मीक आणि सांप्रदायीक विचार कोणताही असो, हे जर संघ म्हणत आहे आणि यालाच सांस्कृतिक राष्ट्रवाद असे नाव देत आहे तर प्रत्येक संघ स्वयंसेवकाचे आचरणही तदनुसार असले पाहिजे. राजकारणातील लोकांच्या पोटी एक आणि ओठी दुसरेच असते. असाही एक प्रवाह आजवरच्या राजकारण्यांनी मांडला आहे. संघाचा स्वयंसेवक जर राजकारणात असेल तर जे पोटी तेच ओठी, मनात ममता तरच जनात समता, तरच जनलोकात समरसता हे आपले सिद्धांत आचरणात आणून दाखविले पाहिजे." [१४]

"आर्थिक राष्ट्रवादाचा अर्थ आहे स्वदेशीचे व्रत. म्हणजे फक्त विदेशी वस्तूंची होळी नव्हे. स्वदेशी व्यापार उद्दीम भरभराटीस आणण्यासाठी ज्या ज्या विदेशी गोष्टी राबवाव्या लागतील त्या त्या सर्व राबवत आणि त्याकरता स्वदेशी बाणा देशात निर्माण करीत काम करावे लागणार आहे. जे जे स्वदेशात निर्माण करता येते ते बाहेरून आणणार नाही. जे बाहेरून आणणे अपरिहार्य असेल ते उद्या त्याची निर्मिती स्वदेशात करता यावी यासाठी आणि यापुरतेच आयात करणे हे "स्वदेशी" चे आयाम आहेत."[१५]

"आज राजकारणाने दा-या आणि दोंगी राष्ट्रवादाने, विदेशी अर्थकारणाने सारे समाजजीवन व्यापले आहे. आपली संस्कृती विसरत जाऊन विदेशी संस्कृतीचा बोलबोला सर्वत्र झालेला आहे. राष्ट्रवादाची संकल्पनाही विदेशीच आहे. हिंदुस्थानात राहतो तो हिंदुस्थानी अशी प्रादेशिक किंवा भौगोलिक राष्ट्रवादाची शिकवण रेटो रुजविली जात आहे. हिंदुस्थानात राहतो तो [illegible] हिंदुस्थानी ही भौगोलिक किंवा प्रादेशिक संकल्पना झाली. हिंदुस्थानला आपली प्राणप्रिय मातृभूमी मानतो तो राष्ट्रीय ही विशुद्ध सांस्कृतिक संकल्पना संतप्रणीत राष्ट्रवादाची आहे."[१६]

पं.दीनदयाळ उपाध्याय यांच्या मते, "पाश्चात्य राजकीय तत्वज्ञान आदर्श समाजाचा स्वीकारार्ह असा आराखडा देण्यास असमर्थ ठरले. कारण त्यांनी व्यक्तीच्या भौतिक सुखाचा जेवढा विचार केला तेवढा सामाजिक स्वास्थ्याचा केला नाही. समाजवाद व भांडवलशाही यामध्ये केवळ लोभ, वर्गद्वेष, शोषण या भावना व अराजक वाढीस लागते. त्या ऐवजी व्यक्तीचा देह, मन, बुध्दी, आत्मा, त्या सर्वांच्या गरजांची पूर्तता जेथे होईल अशा समाजाचा आदर्श बाळगला पाहिजे अशी त्यांची भूमिका आहे. प्रत्येक राष्ट्र या गरजांची पूर्तता होण्यासाठी आवश्यक संस्था निर्माण करते. त्या संस्थात कालसापेक्ष होणे आवश्यक असते. लोकांतील एकतेला बाधा आणणाऱ्या काही विकृती त्यांत निर्माण झाल्यास त्या त्याज्य ठरविण्याची आवश्यकता असते. असे दीनदयाळांचे निःसंदिग्ध प्रतिपादन आहे."[१७]

## संघाच्या तत्वज्ञानातील राष्ट्रवाद संकल्पना :-

"समाजचिंतन" या पुस्तकात रमेश पतंगे यांनी हिंदी राष्ट्रवाद व संघाच्या हिंदुराष्ट्रवादाबाबत मीमांसा केली आहे, "कॉंग्रेस, समाजवादी, साम्यवादी पक्ष, परिवर्तनवादी इत्यादींनी एकच विचारधारा स्वीकारलेली आहे. या विचारधारेचे नाव आहे "हिंदीराष्ट्रवाद". अल्पसंख्याकांना विशेष अधिकार, भारतीय समाजाची हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, पारसी, ज्यू, शीख, जैन, बौध्द, पशुपूजक, अशा विविध पांथिक गटात विभागणी करुन मग त्यांना

एका नव्या प्रवाहात आणण्याची संकल्पना हिंदी राष्ट्रवादाने स्वीकारलेली आहे. या देशात "हिंदू" नावाचा समाज आहे. हिंदूच्या समूहत्वाने काही भावना आहेत, हे हिंदी राष्ट्रवाद मानीत नाही. हिंदूच्या भावनांची स्वीकृती म्हणजे "बहुसंख्यांकांचा जातीयवाद" आहे, अशी या विचारधारेची समजून आहे ही विचारधारा देशाची मुख्य विचारधारा मानण्यात आलेली आहे संघाने ही विचारधारा नाकारलेली आहे. भारत हिंदी राष्ट्र आहे ही संकल्पना संघाला मान्य नाही. भारत हे सनातन हिंदुराष्ट्र आहे हे संघाचे सांगणे आहे. शीख, जैन, बौध्द, पशुपूजक असे विविध धार्मिक गट एकाच विशाल हिंदूधर्माच्या शाखा आहेत हिंदुत्व हेच या देशाचे राष्ट्रीयत्व आहे. मुसलमान, ख्रिश्चनांनी आपली वेगळी उपासनापध्दती, धार्मिक आचार ठेवून ही हिंदुराष्ट्राच्या मूळ सांस्कृतिक प्रवाहात सामील झाले पाहिजे. धर्माच्या नावाने त्यांनी कोणत्याही विशेष सवलती मागता कामा नये. आणि अशा सवलती त्यांना देताही कामा नये. हे संघाचे सांगणे आहे. या देशात बहुसंख्य असलेला व वंशपरंपरेने या देशाचा स्वामी असलेला हिंदूसमाज [शीख, बौध्द, जैन इत्यादी सर्व] जातीयवादी असू शकत नाही त्याला जातीयवादी, जमातवादी म्हणणे या समाजाचा घोर अपमान आहे."[१८]

13119
A

एका भाषणात सरसंघचालक बाळासाहेब देवरस म्हणतात, "येथील राष्ट्रीय व सांस्कृतिक प्रवाहात सामील होणारे ते सर्व हिंदू."[१९] दुसऱ्या एका भाषणात बाळासाहेब देवरस म्हणाले, "हिंदुत्वाच्या व्यापक संकल्पनेत इतर उपासना पध्दतीचे अनुयायी ही समाविष्ट करता येतात. देवरसांची आणखी काही विधाने त्याच अर्थाची आहेत. मुदा. हे लक्षात ठेवावे की हिंदू या शब्दाने एखाद्या धार्मिक संप्रदायाचा किंवा भौगोलिक मर्यादांचा बोध होत नाही, तर तो शब्द अनेक शतके सतत घडलेल्या क्रिया प्रतिक्रियांमुळे समृध्द झालेल्या एका सांस्कृतिक प्रवाहाचे प्रतिक आहे अधिक स्पष्ट शब्दात आणि सावरकरांच्या व्याख्येशी तुलना करीत संघाचे बौध्दिकप्रमुख मा.गो.वैद्य म्हणतात, "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने सामान्यत: सावरकरांची व्याख्या मान्य केली आहे. त्याप्रमाणे आचरणही केले आहे, ज्याची ज्याची पुण्यभू भारताबाहेर आहे तो हिंदू नाही असे सावरकरांनी म्हटले आहे. संघ म्हणतो की, मुसलमान, खिश्चन ही हिंदू होऊ शकतो, जो या देशाचा परंपरा व संस्कृती मानतो, या देशाला जो आपली मातृभूमी समजतो तो हिंदू, मग त्याची उपासना कोणतीही असो. सरकार्यवाह एच.व्ही.शेषाद्री म्हणतात, "संघाच्या दृष्टिकोनाप्रमाणे "हिंदू" ह्या शब्दाने केवळ धर्म नव्हे तर भारताचे राष्ट्रीय व्यक्तिमत्व सुचविले जाते.

ह्या व्यापक राष्ट्रीय अर्थाने जी कुणी व्यक्ती त्या राष्ट्रीय प्रवाहाशी एकरूप होते ती "हिंदू" मग तिचा उपासना पंथ कोणताही असो." संघाचे महाराष्ट्र प्रदेशाचे संयुक्त कार्यवाह डॉ श्रीपती शास्त्री यांनी पुण्याच्या डी.नोबिली कॉलेजमध्ये खिश्चन धर्मगुरु, धर्मप्रचारक, भगिनी, विद्यार्थी आणि प्राध्यापक ह्यांच्यासाठी मुद्दाम बोलाविलेल्या चर्चासत्रात सांगितले की, रा.स्व.संघ हिंदूना हिंदुत्वाच्या [हिंदूनेस] पायावर संघटीत करण्यास बांधील आहे, हा देश आणि त्याची संस्कृती ह्यावर पराकाष्ठेचे प्रेम ह्यालाच हिंदुत्व हे दुसरे नांव आहे. हिंदू ह्या शब्दाचा अर्थ धार्मिक नसून राष्ट्रीय आहे किंबहुना इस्लाम व खिस्ती धर्म ज्या अर्थाने धर्म आहेत त्या अर्थाने हिंदू धर्म हा धर्म नाही."[२०]

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी "राष्ट्र जीवन की दिशा" या पुस्तकात आपले राष्ट्रवादाबाबत विचार पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेले आहेत. "पश्चिमेकडील राष्ट्रवादाशी भारतातील राष्ट्रवादाची तुलना करणे चुकीचे आहे. पश्चिमेत द्वैतभावनेतून संघर्षावर भर देण्यात आला तर भारतात अद्वैताच्या आधारावर समन्वयाचा आग्रह धरला गेला. युरोपात राष्ट्रवादाच्या अतिरेकी भावनेमुळे विनाश ओढवला. म्हणून भारतातील राष्ट्रवादालाही विनाशकारी ठरवणं म्हणजे, दुधानं तोंड पोळल्यावर ताक फुंकून पिण्यासारखंच आहे.

जगातल्या काही देशांनी अवघ्या हजार पाचशे वर्षांच्या इतिहासात भीषण धुमाकूळ घातले. तसे एखादेही उदाहरण भारताच्या पाच हजार वर्षांच्या इतिहासात आढळत नाही. संपूर्ण जगाला जर विद्वेषाच्या भावनेपासून वाचवायचे असेल तर भारतीय राष्ट्रवाद ताकदीने उभा करावा लागेल. हाच विश्वकल्याणाचा मार्ग असेल." [२१]

"राष्ट्र" या पुस्तकात संघाचे माजी सरसंघचालक मा.स.गोळवलकर राष्ट्रवादाबाबत आपली भूमिका सांगताना स्पष्ट करतात, "ही मातृभूमी जर आमच्या श्रद्धेचा विषय आहे तर मग तिचा अपमान आपण कसा सहन करू शकू? मातृभूमीच्या भक्तीचे दोन प्रकार आहेत. पहिला म्हणजे तिची धूळ आपल्या कपाळी लावावयाची आणि दुसरा प्रकार म्हणजे मातृभूमीच्या चिंतनात तल्लीन राहावयाचे आणि जर कोणी मातृभूमीच्या संबंधात अपशब्द उच्चारले तर त्याला धडा शिकवायचा ज्यायोगे पुन्हा तो तसे अपशब्द उच्चारायला धजणार नाही. कोणी मातृभूमीचा अपमान केला तर बेचैन व्हावयाचे, स्वस्थ बसायचे नाही, आक्रमकाला धडा शिकविण्यासाठी वातावरण निर्माण करावयाचे आणि मार्गात येणाऱ्या सर्व अडचणी हसत सहन करावयाच्या, हीच खरी भक्ती होय."

मातृभूमीची हीच भक्ती खरी असून या दोन्ही प्रकारच्या भक्तीची आज नितांत आवश्यकता आहे. या श्रद्धेच्या आधाराने समाजाला एकत्रित करणे सोपे ठरेल. हीच श्रद्धा नसल्यामुळे लोक जात आणि भाषा यांच्या नावाने आपसांत भांडत बसतात. परकीय संकट आले तरी हे आपसांतले भांडणे झगडणे सोडत नाहीत."[२२]

राष्ट्रवादाची उपासना करण्यात आपल्यात काय कमतरता राहिली याचे विश्लेषण करताना मा.स.गोळवलकर म्हणतात, "हजार वर्षांपासून समाजावर संकटे येत राहिली आहेत. समाज छिन्न विछिन्न होऊन गेलेला आहे. दीन आणि दरिद्री झाला आहे, तरीही स्वार्थासाठी निरनिराळे पक्ष निर्माण करावयाचे व स्वार्थासाठी त्यांचा जास्तीत जास्त उपयोग करावयाचा हे आजही चालूच आहे. पण याचे काय कारण आहे? ते कारण हेच आहे की, त्यांच्यात मातृभूमीप्रत उत्कट अशा श्रद्धेचा अभाव आहे. त्याचा एक हा पुत्ररूप समाज एक परिवार आहे, त्याचा एक विशिष्ट कुलाचार आहे, त्याची एक परंपरा आहे आणि लहान लहान भेद असले तरी, सर्वांचे मूळ एक आहे. हे ज्ञानच नष्ट झाले आहे त्यामुळे ही दुःखद स्थिती उत्पन्न झाली आहे."[२३]

"राष्ट्रभक्ती व स्वातंत्र्याबद्दलचे प्रेम या गोष्टी राष्ट्रवादासाठी पायाभूत आहेत. भारतीय राष्ट्रवादाची वाढ होण्यास प्राचीन कालातील हिंदूंच्या महानतेबद्दलचे वाढते ज्ञान कारणीभूत आहे."[२४]

"अनेक परिश्रमांनी महान बनण्यासाठी कोणत्याही राष्ट्राला जनशक्ती सुसंघटीत करून उपयोगात आणावी लागते. महान होण्यासाठी राष्ट्राने धर्मापासून, म्हणजेच योग्य मार्गापासून ढळणे योग्य नाही हेच संघाच्या राष्ट्रवादाचे ब्रीदवाक्य आहे."[२५]

" संघाच्या राष्ट्रवाद समाज आणि व्यक्ती, समाज आणि भूप्रदेश, त्याचा इतिहास, थोर संस्कृती ह्यांची हिंदूराष्ट्राच्या संकल्पनेशी सांगड घालतो. दीनदयाळ उपाध्यायांच्या "एकात्ममानवदर्शन" या ग्रंथातून त्यांच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या संकल्पनेत मर्मदृष्टी मिळते या विचारात नवे असे काहीच नाही. त्यात मूलतः भारतीय अशी समग्र दृष्टीच आहे. संघाचा हिंदुराष्ट्रवाद हा एकात्म मानववादातील एक अध्याय आहे. एकात्ममानववाद व सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या तत्वज्ञानाचे मूळ वेदकाळापासून विकसीत झालेल्या भारतीय तत्वज्ञानात आहे."[२६]

## संघ तत्त्वज्ञानातील राष्ट्रबांधणी विषयक विचार

राष्ट्र, राष्ट्रवाद व राष्ट्रबांधणी, ह्या संकल्पनांची सरमिसळ इतकी घट्टपणाने झाली आहे की त्यांचा तुकड्या तुकड्याचे विचार करणे शक्यही होणार नाही व उचितही होणार नाही. संघाच्या राष्ट्रपुनर्निर्माणाच्या म्हणजेच राष्ट्रबांधणीच्या प्रयत्नांची माहिती होण्यासाठी संघाशी संबंधित विविध संघटना, वेगवेगळ्या क्षेत्रात कोणत्या भूमिकेतून कार्य करीत आहेत हे पाहण्याची गरज आहे. एकात्म मानववाद किंवा मानवाचा समग्र विचार ही संघविचाराचा गाभा आहे. माणसाचा देह, बुध्दी, मन व आत्मा यांच्या गरजांची निकोप पूर्तता करण्यासाठी समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रांची राष्ट्रपुनर्निर्माणाच्या व्यापक संदर्भात पुनर्रचना करायला हवी. इ.स. १९२५ ते आजपर्यंत संघाचे वाटचाल पाहता संघाने राष्ट्रजीवनाशी संबंधित प्रत्येक क्षेत्रात विविध संघटना स्थापन करुन त्या संबंधित क्षेत्राची पुनर्रचना करण्याचे प्रयत्न चालविले आहेत. उदा.राजकीय [भारतीय जनता पक्ष ], शैक्षणिक [अखिल भारतीय विद्यार्थी परिषद], धार्मिक [विश्व हिंदु परिषद], कामगार [भारतीय मजदूर संघ], शेतकरी [भारतीय किसान संघ], सामाजिक [सामाजिक समरसता मंच ], वनवासी कल्याण [वनवासी कल्याण आश्रम], आर्थिक राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारा [स्वदेशी जागरण मंच] विज्ञान [विज्ञानभारती] आरोग्य [जनकल्याण समिती] सांस्कृतिक [संस्कार भारती ], प्रकाशन [भारतीय विचार साधना, सुरुची],

पत्रकारिता [ विवेक, पांचजन्य, नियतकालिके] इत्यादी त्या त्या क्षेत्रांची विशिष्ठ गरज लक्षात घेऊन त्या संघटनांनी आपली तात्विक भूमिका, निश्चित केली असली तरी त्या सर्वांचे काही समानसूत्र आहे एकात्ममानववादाचा आदर्श, संयमित उपभोगाचा आग्रह, विग्रहापेक्षा समन्वय व संघर्षापेक्षा सुसंवादावर भर, सर्वांचे अंतिम हित एकच आहे ही धारणा, अशी यांची काही वैशिष्टये सांगता येतील. व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र व संपूर्ण सृष्टी असा क्रमाक्रमाने विकसित होत जाणा-या ह्या सर्व टप्प्यांमध्ये कोणताही विसंवाद नाही. हे सर्व एकाच "मी" चे अधिकाधिक व्यापक होत जाणारे आविष्कार आहेत अशी भूमिका संघाने घेतली आहे.

संघ परिवारातील संघटना :-

त्या संघटनांची माहिती त्या त्या संघटनांची परिपत्रके व जाणकारांशी चर्चा करुन घेतली आहे. त्या संघटनांची संक्षिप्त माहिती पुढीलप्रमाणे :--

१) अखिल भारतीय विद्यार्थी परिषद :-

९ जुलै १९४९ रोजी स्थापना झालेली ही संघटना भारतातील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना आहे. महाविद्यालयीन व त्यानंतर त्यानंतरच्या विद्यार्थी दशेतल्या काही काळ सक्रिय राहणारे विद्यार्थी कार्यकर्ते, शिक्षण संपवून मानधन न घेता पूर्णवेळ संघटनेसाठी कार्य करणारे पूर्णकालिक कार्यकर्ते, व आपल्या व्यवसायामुळे कायम शिक्षण क्षेत्रात राहणारे शिक्षक व प्राध्यापक

कार्यकर्ते यांच्या माध्यमातून विद्यार्थी परिषदेचे काम चालते. विद्यार्थी परिषदेने पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहण्याची भूमिका स्विकारल्यामुळे संघपरिवारातील राजकीय पक्षाच्या यशापयशाचा प्रतिकूल परिणाम विद्यार्थी परिषदेच्या कामावर झाला नाही. विद्यार्थी परिषदेने "शैक्षणिक परिवाराची" संकल्पना मांडली आहे. विद्यार्थी शिक्षण व्यवस्थेच्या केंद्रस्थानी मानला गेला पाहिजे विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक व प्रशासक यांचा मिळून शैक्षणिक परिवार बनत असतो. व या विविध घटकांच्या विसंबंधामध्ये संघर्ष नाही असी विद्यार्थी परिषदेची धारणा आहे. आजचा विद्यार्थी हा उद्याचा नव्हे तर आजचा नागरिक आहे. या भूमिकेतून विद्यार्थी परिषद केवळ शैक्षणिक बाबतीतच नव्हे तर समाज व राष्ट्रजीवनाशी संबंधीत प्रत्येक प्रश्नावर भूमिका घेत असते. शिक्षणक्षेत्राच्या गरजेनुसार विद्यार्थी परिषदेचा स्वतःचा असा परिवार निर्माण होऊ लागला आहे. तंत्र शिक्षण विद्यार्थी परिषद, कृषिशिक्षण विद्यार्थी परिषद, विकासार्थ विद्यार्थी, या संघटना, "आंतरराज्य छात्र जीवनदर्शन" हा विविध राज्यातील विद्यार्थ्यांमधील सांस्कृतिक देवाणघेवाणीचा उपक्रम आणि छात्रशक्ती व विद्यार्थी यासारखी नियतकालिके असा विद्यार्थी परिषदेचा विस्तार झाला आहे.

२) <u>वनवासी कल्याण आश्रम</u> :-

१९५२ मध्ये स्थापन झालेल्या वनवासी कल्याण आश्रमाचे काम प्रामुख्याने सेवा प्रकल्पाच्या स्वरुपाचे आहे. आदिवासी भागात वनवासीकल्याण आश्रमाची केंद्रे, दुर्गम भागातील आदिवासींना शिक्षण व आरोग्य विषयक सुविधा पुरविण्यासाठी शाळा, रुग्णालये, चालविणे व फिरते दवाखाने चालविणे, आदिवासींसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्या यासाठी प्रयत्न करणे. आदिवासींच्या प्रश्नाबाबतची पुरेशी सैध्दांतिक मांडणी वनवासी कल्याण आश्रमाने केल्याचे आढळत नाही. आदिवासींच्या विस्थापित होण्याचा प्रयत्न "नर्मदा बचाव" आंदोलनाने जेवढा उचलून धरला तशी भूमिका वनवासी कल्याण आश्रमाने घेतल्याचे आढळत नाही.

३) <u>भारतीय मजदूर संघ</u> :-

१९५५ मध्ये स्थापन झालेला भारतीय मजदूर संघ ही भारतातील सर्वात मोठी कामगार संघटना आहे. विमाकंपन्या बँकींग क्षेत्र, विद्युत महामंडळे, यातील अनेक कामगार संघटना भारतीय मजदूर संघाशी संलग्न आहेत. भारतीय मजदूर संघाने 'औदयोगिक परिवाराची' संकल्पना मांडली आहे. भांडवलदार, कामगार, व्यवस्थापकवर्ग व उपभोक्तावर्ग [ग्राहक] या सर्वांचा मिळून "औदयोगिक परिवार" बनतो.

व त्या सर्वांचे हितसंबंध हे परस्पर विरोधी नसून परस्पर पूरक आहेत. अर्थाचा अतिरिक्त अभाव किंवा अवाजवी प्रमाण हे दोन्ही विकृतीला जन्म देतात. त्यामुळे प्रत्येकाला किमान गरजांच्या पूर्तेची हमी मिळणे व संपत्तीचा अतिरेकी साठा कोणाकडेच न होणे त्या विचारांसाठी "अर्थायाम" ही संज्ञा वापरण्यात आली आहे. कामगारवर्ग व भांडवलदार वर्गाला त्या संकल्पनेला स्वीकार करून आपले हितसंबंध परस्पर पूरक होतील हे पाहणे शक्य असते.

४) <u>विश्व हिंदु परिषद</u> :-

१९६४ मध्ये स्थापन झालेल्या विहिंपने विविध हिंदु संप्रदायांचा समन्वय करणे, धर्मपरिवर्तन केलेल्या हिंदूंना शुद्ध करून धर्मात परत घेणे, गोहत्या बंदी, अशा गोष्टींबाबत कार्य केले आहे. पूर्वास्पृश्यांकरवी प्रतिमा पूजन, वेदपठन, असे पारंपरिक कर्मकांडाला छेद देणारे उपक्रमही विश्व हिंदु परिषद (वि.हिं.प.) राबवत असते. रामजन्मभूमी प्रश्नाबाबत, विहिंपने अतिशय आक्रमक व विवादग्रस्त अशी भूमिका घेतली व तेव्हापासून विहिंप प्रसिद्धीच्या झोतात आली. युवकांसाठी "बजरंगदल" व युवतीसाठी "दुर्गावाहिनी" या विहिंपच्या संलग्न संघटना आहेत. देशभर संघटनेचे जाळे विणण्यासाठी विहिंपने वापरलेले तंत्र तिचा पाया व्यापक करण्यात यशस्वी ठरले आहे.

राममंदिराच्या उभारणीसाठी प्रत्येक हिंदूकडून एक रुपया घेणे, प्रत्येक गावातून एक वीट घेणे, अशा उपक्रमातून लोकांच्या धार्मिक भावनांना आवाहन करत जास्तीत जास्त हिंदूपर्यंत पोहोचण्यात यशस्वी ठरली आहे. विहिंपच्या साधू व साध्वींनी रामजन्मभूमी आंदोलनांच्या वेळी हिंदूमधील जो अभिनिवेश जागा केला त्याचा कायमचा ठसा भारतीय राजकारणावर उमटला आहे. बहुसंख्याक अभिनिवेश अशा रितीने वाढीस लागणे ही चिंतेची बाब आहे.

५) <u>सामाजिक समरसता मंच</u> :-

स्थापना १९८४ मध्ये झाली. दलित, भटके, विमुक्त यांच्यासाठी ही संघटना काम करते. दलितांच्या चळवळीने आक्रमक रूप धारण केल्यास जातीभेद दूर होण्यात अडथळे निर्माण होतील. त्यापेक्षा सर्व जातींच्या - पोटजातींच्या व्यक्तींपुढे राष्ट्रभक्तीचे उदात्त ध्येय, समोर ठेवल्यास, त्या राष्ट्राच्या हितासाठी झटणारे आपण सर्व एक आहोत. या विचारातून सामाजिक समरसता साधणे शक्य होईल. अशी मंचाची भूमिका आहे.

६] भारतीय जनता पक्ष :-

सध्या लोकसभेत सर्वात मोठा असलेला भारतीय जनता पक्ष हा पूर्वाश्रमीच्या भारतीय जन संघाचा नवा अवतार आहे. १९५१ पासून भारतीय जन संघाच्या विचारांचा राजकीय पक्ष म्हणून प्रामुख्याने हिंदी पट्यात व त्यातही शहरी सवर्ण हिंदू पुरता मर्यादित राहिला. आणीबाणीनंतरच्या निवडणुकीत तो जनता पक्षात विलीन झाला. जनता पक्षात पूर्वाश्रमीच्या जनसंघाच्या कार्यकर्त्यांचे अन्य घटक पक्षांशी जनसंघ व रा.स्व. संघ यांच्या नात्यामुळे तीव्र मतभेद झाले आणि १९८० मध्ये पूर्वीचे जनसंघी आणि त्यांच्याबरोबर जनता पार्टीतून बाहेर पडलेले काही नवे कार्यकर्ते १९८० मध्ये भारतीय जनता पक्षाची स्थापना करते झाले. पूर्वीच्या जनसंघापेक्षा भाजपचा सामाजिक पाया थोडा अधिक व्यापक आहे. संघाच्या शिस्तीत तयार झालेल्या कार्यकर्त्यांचे पक्षाच्या एकूण कार्यकर्त्यांशी असलेले प्रमाण जनसंघात जेवढे अधिक होते तेवढे राहीलेले नाही. जनसंघाचा ब्राह्मणी तोंडावळा बदलण्यात आणि ग्रामीण भागात ही शिरकाव करुन घेण्यात भाजपला यश आले असले तरी अदयापही पूर्वेकडील व दक्षिणेकडील राज्ये, ग्रामीण भाग, धार्मिक अल्पसंख्य व हिंदूमधील मागास जातींमध्ये या पक्षाला व्यापक जनाधार नाही. ह्या अकराव्या लोकसभा निवडणुकीत २२% मते मिळविण्यात भाजपला यश मिळाले आहे. अटलबिहारी वाजपेयी अध्यक्ष असताना गांधीवादी समाजवाद ही आपली अधिकृत विचारप्रणाली मांडणा-या भाजपने पुढे गांधीवादी समाजवाद या

शब्दप्रयोगाऐवजी पंडित दीनदयाळ उपाध्यायांनी रूढ केलेल्या "एकात्म मानववाद" या संकल्पनेचाच स्वीकार करण्याचे ठरविले.

७] भारतीय स्त्री शक्ती :-

संघविचारांची समांतर संघटना म्हणून राष्ट्र सेविका समिती गेली ६० वर्षे सक्रिय असली तरी स्त्री प्रश्नाचे नव्याने विश्लेषण व अधिक सुस्पष्ट मांडणी करण्यासाठी १९८१ मध्ये भारतीय स्त्री शक्तीची स्थापना करण्यात आली. १९७५ नंतर भारतात सुरू झालेल्या स्त्री मुक्ती चळवळीची योग्य दखल घेऊन भारतीय स्त्री शक्तीने स्त्री पुरुष समानतेची भारतीय संदर्भात अनुकूल अशी मांडणी केली आहे. पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळे सत्ता, संपत्ती, सन्मान व संधी यापासून स्त्रिया वंचित राहतात, स्त्री पुरुषातील सत्तासंबंध बदलणे आवश्यक आहे हे स्त्रीशक्ती मान्य करते. मात्र पुरुषसत्ताक व्यवस्था ही काही कट करून सर्व पुरुषांनी सर्व स्त्रियांना दडपून टाकण्यासाठी संगनमताने लादलेली व्यवस्था नाही. अशी स्त्री शक्तीची भूमिका आहे. त्यामुळे स्त्री विरुद्ध पुरुष असा संघर्ष स्त्री शक्तीला अभिप्रेत नाही. प्रचलित कुटुंब व्यवस्था निर्दोष नाही, कुटुंबातही स्त्रीवर अन्याय होतो आहे हे स्त्री शक्ती मान्य करते. मात्र कोणत्याही समाज व्यवस्थेत माणसाला भावनिक स्थैर्य व सुरक्षितता मिळण्यासाठी कोणत्या ना कोणत्या रूपातील कुटुंब आवश्यकच असेल.

सध्याच्या कुटुंबाची रचना, त्याअंतर्गत निर्णय प्रक्रिया, अशा अनेक बाबी बदलणे आवश्यक आहे. म्हणजे कुटुंब पार पाडत असलेली कामे तितक्याच क्षमतेने करू शकणारी पर्यायी रचना समोर येईपर्यंत कुटुंब संस्था मोडीत काढणे योग्य ठरणार नाही अशी भूमिका स्त्री शक्ती घेते. सध्या महाराष्ट्रात १६ जिल्ह्यांमध्ये २२ ठिकाणी स्त्रीशक्तीचे काम चालते. व महाराष्ट्राबाहेर ३ राज्यांत भारतीय स्त्री शक्तीच्या माध्यमातून नैमित्तिक कार्यक्रम केले जातात. यात प्रामुख्याने कर्नाटकात बेंगलोर, बिहारमध्ये पटना व रांची व मध्यप्रदेशात इंदूर या ठिकाणांचा समावेश आहे. स्थायी स्वरूपाचे काम असणाऱ्या ठिकाणी कुटुंब सल्ला केंद्र, कायदे सल्ला केंद्र, उद्योजकता शिबीरे, व्यक्तित्व विकास शिबीरे, स्त्रियांच्या अन्याय व अत्याचाराबाबत आंदोलने, विविध स्त्री प्रश्नाबाबत व शासकीय धोरणाबाबत चर्चासत्रे, परिसंवाद व अभ्यास मंडळे असे स्त्री शक्तीच्या कामाचे स्वरूप असते.

संघाशी संबंधित मोजक्याच संघटनांचा येथे विचार केला आहे. संघाच्या कार्याचे पैलू स्पष्ट होण्याच्या दृष्टीने सध्या एवढाच तपशील ह्या प्रबंधात समाविष्ट केला आहे. राष्ट्रबांधणी बद्दलच्या किंवा संघाच्या परिभाषेत राष्ट्रपुनर्निर्माणाविषयीच्या संघाच्या विचारांशी चर्चा पुढे केली आहे.

पुढील भागात रा.स्व.संघाच्या विचारांत भर त्याचे योगदान देणाऱ्या काही प्रमुख विचारवंतांच्या मांडणीचा आढावा घेतला आहे.

श्री.मा.स.गोळवलकर उर्फ गोळवलकर गुरुजी, पं.दीनदयाळ उपाध्याय, श्री.दत्तोपंत ठेंगडी, श्री.मधुकरराव उर्फ बाळासाहेब देवरस यांचा त्यात समावेश आहे. गोळवलकर गुरुजींचे विचार अधिक प्रमाणात पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले असल्याने त्यांच्या विचारांची अधिकतपशीलात दखल घेणे शक्य झाले आहे. राष्ट्रबांधणी, राष्ट्रपुनर्निर्माण विषयीच्या विचारासंदर्भात अनुषंगाने, हिंदु-मुस्लिम प्रश्न, स्त्रीप्रश्न सामाजिक समता, स्वदेशी, वर्णव्यवस्था, चार पुरुषार्थ धर्म, या बाबतच्या विचारांचाही आढावा आवश्यक तेथे घेतला आहे.

राष्ट्रनिर्माण कसे झाले याबद्दल पं.दीनदयाळ म्हणतात "राष्ट्रनिर्माण या शब्दात आम्हाला कृत्रिम प्रयत्नांनी राष्ट्र निर्माण करणे अभिप्रेत नाही एखादे घर बांधता येते तसे राष्ट्र बांधता येत नाही राष्ट्रबांधणीत राष्ट्र बळकट करण्याची भावना आहे. राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया ही स्वाभाविकपणे सुरु होणारी प्रदीर्घ अशी प्रक्रिया आहे. सृष्टीच्या रचनेतच कोणत्या राष्ट्राचे सृजन अभ्युदय, पुनरुत्थान किंवा अध:पात होणार ते निश्चित होत असते. सृष्टीने निश्चित केलेले कार्य पार पाडत असेपर्यंत राष्ट्राचे अस्तित्व टिकून राहते. आपल्याच राष्ट्राचे उदाहरण घेतले तर नेमके कोणत्या दिवशी हे राष्ट्र निर्माण झाले हे कोणीही सांगु शकणार नाही. इतिहासाची पाने उलटून उलटून संपून गेली तरी तेव्हाही हे राष्ट्र होतेच असेच म्हणावे लागेल. असा कोणता दिवस सांगता येत नाही. ज्यादिवशी या राष्ट्राचा जन्म झाला असे म्हणता येईल, जगातील अनेक राष्ट्रांचा असाच विकासक्रम राहिला आहे एका प्रदीर्घ आणि निरंतर अशा प्रक्रियेत पिढ्यानपिढ्या पिढ्या एक विशिष्ट प्रवृत्ती होऊन जन्मास येतात. त्यातूनच येथील 'जन' प्रगट होतो. त्या मूळप्रवृत्तीच पोषण जी भूमी करते त्या भूमीचे या जनांशी आईसारखे नाते असते. ती भूमी केवळ जमिनीचा तुकडा नसते तर मातृभूमी असते." [२७]

"राष्ट्राचे स्वरूप त्या जनाच्या/लोकांच्या सामूहिक मूळप्रवृत्तीनुसार ठरत असते. हीच त्या राष्ट्राची चिती [ Ethos ] होय. कालानुक्रम बाह्य रचनेत कितीही बदल घडले तरी राष्ट्राच्या मूळ प्रवृत्तीत बदल होत नाही. जे कार्य पार पाडण्यासाठी राष्ट्र अस्तित्वात आले आहे ते कार्य करत असेपर्यंत राष्ट्राचे चैतन्य टिकून असते. त्या चैतन्यामुळेच राष्ट्र मोठयात मोठा त्याग करण्यासाठी उद्युक्त होऊ शकते. व्यक्तीजीवनात जसे सुख-दुःख, उन्नती-अवनती असे क्षण आले तरी व्यक्ती आपली अस्मिता टिकवून ठेवत असते. सद्सद्विवेकाच्या आधारे योग्य - अयोग्य, चांगले - वाईट याचा निर्णय करणे त्याप्रमाणेच मातृभूमीशी एकनिष्ठ असणा-या लोकांचे [जन ] राष्ट्रही आपली "चिती" जागृत ठेवून समर्थ व स्वावलंबी जीवन जगत रहाते."[२८]

दीनदयाळ उपाध्यायांच्या त्या विचारातून संघविचारात असणा-या गूढ छटेचा व आध्यात्मिक बैठकीचा संकेत मिळतो. यासंबंधीचे अधिक स्पष्ट विवेचन श्री.बद्रीसाह दुलधारिया यांच्या 'दैशिकशास्त्र' ह्या ग्रंथात आहे. ते लिहितात, "शरीर निरामय असण्यासाठी जशी वैद्यकशास्त्राची गरज आहे. तशी जाती निरामय होण्यासाठी दैशिकशास्त्राची गरज आहे. वैद्यकशास्त्राच्या ज्ञानाभावी चार दोनच व्यक्तींची हानि होईल.

पण दैशिकशास्त्राच्या ज्ञानाच्या अभावी संपूर्ण देशाचीच हानि होईल. म्हणून दैशिकशास्त्र शक्त असणे अपरिहार्य आहे. आमच्या सर्व शास्त्रांत हे दैशिकशास्त्र प्रधान मानले गेले आहे. सर्व स्मृतींच्या भिन्न भिन्न नद्या या दैशिक शास्त्ररूपी महासागरातच मिळाल्या आहेत. सर्वांना त्याचे अध्ययन आवश्यक होते. या शास्त्राच्या आधारानेच प्लेटो आणि ॲरिस्टॉटलच्या फार पूर्वीच आम्ही आदर्श समाजरचना करुन दाखविली होती. हजारो वर्षांचा अनुभव त्यामागे आहे या अनुभवानेच किंवा त्या पेक्षाही समाधिजन्य ज्ञानानेच हे शास्त्र उत्पन्न झाले असले पाहिजे. दैशिक शास्त्राचा आधार इतिहास असतो. अशा अनेक सिद्धांताच्या मंथनातून दैशिक सिद्धांत निघतात व या दैशिक सिद्धांतातून दैशिक शास्त्र निघते. त्यातूनच दैशिक व्यवहार होतात.. शेकडो वर्षांच्या व्यवहाराने या अनुभवजन्य शास्त्रावर निकष जडते. आमच्याकडे पूर्वजांचा इतिहास लिहीण्याची पद्धत नसल्यामुळे समाधिजन्य ज्ञानातूनच या शास्त्राची निर्मिती झाली असावी असे मानणे जास्त योग्य आहे ते कसेही असले तरी आमच्यासारखे दैशिकशास्त्र अन्य कोठेही उपलब्ध होण्यासारखे नाही." [२९]

राष्ट्रभक्तीच्या अभावी राष्ट्राचे चैतन्य क्षीण होते हे सांगताना पं.दीनदयाळ उपाध्याय म्हणतात, "मातृभूमीबद्दल प्रेम नसल्यामुळे आमच्या राष्ट्रजीवनात अनेक विकृत्या शिरल्या आहेत.

पाकिस्तानची निर्मिती हे त्याचे ठळक उदाहरण आहे. मुसलमानांच्या विभक्त राज्याची भूमीच केवळ पाक आहे पवित्र असा दृष्टीकोन राष्ट्रभक्तीच्या अभावाचेच लक्षण आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ही विकृती दूर करण्याचा प्रयत्न झाला नाही त्यामुळे मातृभूमीचे तुकडे करून पाकिस्तानची निर्मिती झाली भारत स्वतंत्र झाल्यानंतरही राष्ट्रभक्तीची शुध्द भावना जागवण्याचा प्रयत्न झाला नाही. त्या विकृती दूर करण्याचा उपाय आमच्या संस्कृतीत उपलब्ध आहे आमच्या संस्कृतीचा आधार हा भोगवादी वृत्ती नसून त्यागाची प्रेरणा हा आहे. रामाने लंका जिंकली तरी ती बिभीषणास दिली, छत्रपती शिवाजींनी जयसिंहाना सांगितले की, मुघलांची संगत सोडा आणि हे सर्व राज्य तुम्हीच सांभाळा मला राज्याचा मोह नाही. भरताने तपस्वयाप्रमाणे जीवन जगत रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून राज्यकारभार पाहिला." [30]

अशा उदाहरणांनी त्यागाची परंपरा, विशद करत राष्ट्रजीवनात शिरलेल्या विकृतीचं कारण आसक्ती हेच आहे. असे प्रतिपादन उपाध्याय करतात, "सेवावृत्तीची जागा सत्तेच्या लालसेने घेतली आहे एकूणच जीवनाकडे पाहण्याच्या भोगवादी दृष्टीकोनामुळे मानवी भावनांचे आणि जीवनमूल्यांचे आमच्या लेखी काहीच मोल उरलेले नाही व्यक्तीची प्रतिष्ठा, चारित्र्य सद्गुण क्षमता, योग्यता, यावरून न ठरता त्याच्या आर्थिक स्थितीवरून ठरत आहे.

ही परिस्थिती विकृतीला जन्म देणारी आहे. अर्थाचा अतिरेकी प्रभाव ह्या विकृती निर्माण करत आहे अर्थ हे भौतिक आवश्यकतांची पूर्तता करण्याचे साधन एक आहे. साध्य नाही जीवनकडे बघण्याचा एकूणच दृष्टीकोनच बदलण्याची गरज आहे."[३१] "राष्ट्राच्या चिरजीवनसाठी समष्टी भावजागृत ठेवण्याची गरज आहे आज राष्ट्राचा आत्मा क्षीण झालाआहे. एकात्मतेची भावना कमजोर झाली आहे. आत्मीयतेची जागा तिरस्काराने घेतली आहे. राष्ट्रभावनेचा -हास झाल्यामुळे अनेक समस्या उद्भावल्या आहेत. या समस्यांवर वरवरची उपाययोजना केल्यानं त्यांची कायमची सोडवणूक होऊ शकणार नाही. राष्ट्रभावने अभावी कोणतेच राष्ट्र उन्नती करू शकत नाही हे त्रिकालाबाधित सत्य आहे."[३२]

"राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही राजकीय संघटना नाही. सत्तेच्या राजकारणापासून संघ नेहमीच दूर राहिलेला आहे केवळ राजसत्तेच्या आधारे सर्वांगिण परिवर्तन शक्य नाही. हा संघाचा विश्वास आहे. सर्वांगीण परिवर्तनासाठी सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त राहून, माणूस घडविण्याचे काम करणे चारित्र्य संपन्न व्यक्ती निर्माण करीत राहणे, हेच संघाचे प्राथमिक आणि मूलभूत काम आहे."[३३]

"प्रत्येक माणूस स्वार्थी असतो, पण त्याचा स्वार्थ त्याच्यापुरता न ठेवता जर तो व्यापक केला, कुटुंब, समाज देश, विश्व, अशा चढत्या क्रमाने त्याच्या कक्षा वाढविल्या तर त्या स्वार्थाचे नामकरण बदलत जाते व तो परमार्थात परावर्तित होत असतो."[३४]

राष्ट्रनिर्मितीबाबत "समाजचिंतन" पुस्तकात रमेश पतंगे स्पष्ट करतात, "राष्ट्रनिर्मिती ही एक फारच गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. एक भूमी, समान संस्कृती, समान वंश एकभाषा, समान इतिहास इत्यादी घटकांना राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत महत्वाचे स्थान असते. या व अशाच प्रकारच्या समान घटकांमुळे समान हितसंबंध निर्माण होत असतात. हे समान हितसंबंध जनसमुहाला एकमेकांशी बांधून ठेवतात व एका भूमीवर राहणारा मनुष्यसमाज, त्या भूमीच्या आधारे आपल्या आकांक्षा पूर्ण करतो. या आकांक्षा मुख्यत: इहलोकीच्या आकांक्षा असतात. त्यात आपल्या समाजाची भौतिक प्रगती अपेक्षित असते. याचबरोबर जगातील असंख्य राष्ट्रांच्या समेहात माझ्या राष्ट्राची मानवजातीच्या उत्कर्षात कोणती भूमिका आहे याचाही अंतर्भाव असतो."[३५]

"निवडणुका लढविणे वा राजकीय व्यासपीठ गाजविणे ही उद्दिष्टे संघापुढे नसल्यामुळे वा-याच्या-या विधायक राष्ट्रउभारणीची भूमिका संघाला निर्भयपणे घेता आले तत्वांच्या व आदर्शाच्या बाबतीत तडजोडीचा प्रश्न आला नाही .

राष्ट्राच्या इमारतीचा हजारो वर्षांच्या काळात घातलेला गेलेला पाया भक्कम ठेवून वरील थरांनी भागात मात्र आवश्यकतेनुसार फेरफार करण्याची ही नीती आपल्या समाजाला एकाचवेळी सातत्य आणि गतिशीलता देण्यास समर्थ ठरली आहे."[३६]

"एकात्म मानववाद" या मध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी संघाच्या राष्ट्रबांधणी संकल्पनेच्या तत्त्वज्ञानाचे विवेचन केले आहे, " ज्या प्रमाणे राष्ट्राचा आधार म्हणजे चिती त्याचप्रमाणे ज्या शक्तीमुळे राष्ट्राची धारणा होते. त्यास विराट म्हणतात. विराट म्हणजे राष्ट्राची कर्मशक्ती आहे जी चितीमुळे जागृत व संघटित होते. शरीरात प्राणाचे जे स्थान आहे तेच राष्ट्रजीवनात विराटचे असते. प्राणामुळेच सर्व इंद्रियांचा शक्ती मिळते बुद्धीला चैतन्य प्राप्त होते, व आत्मा शरीरात राहतो. विराटाच्या आधारावरच प्रजातंत्र यशस्वी होत असते व राज्य बलशाली होते या अवस्थेमध्ये राष्ट्राची विविधता व वैचित्र्य त्याच्या एकतेला बाधक ठरत नाहीत. भाषा, व्यवसाय, इत्यादी भेद सगळीकडेच असतात. पण जसे विराट इंद्रियाप्रमाणे किंवा कुटुंबातील घटकाप्रमाणे सर्व लोक परस्पर पूरकतेने कार्य करतात."[३७]

विजयवाडा - अधिवेशनानंतर सुमारे ३ महिन्यांनी १९६५ च्या एप्रिलमध्ये मुंबई येथे "जनसंघाचे सिध्दांत व नीती". या विषयावर दीनदयाळजींची ४ भाषणे झाली होती. त्यापैकी पहिले प्रास्तविक भाषण हे राष्ट्रबांधणीबद्दलचे विचार स्पष्ट करणारे होते. त्या भाषणात ते म्हणाले, "आपल्या देशावर इंग्रजांचे राज्य होते तोपर्यंत देशात जेव्हा म्हणून आंदोलने होत असत जे राजकारण चालत असे, त्या सर्वांचे लक्ष्य स्वराज्य प्राप्त करणे एवढेच होते स्वराज्य मिळाल्यानंतर आपले स्वरुप काय राहील ? आपण कोणत्या दिशेने वाटचाल करणार आहोत. यासंबंधी फारसा विचार झाला नाही. अजिबात विचार झाला नाही असे म्हणता येणार नाही. गांधीजींनी "हिंद स्वराज्य" लिहून स्वातंत्र्यानंतर भारताचे चित्र कसे असेल या संबंधीचे स्वतःचे विचार नमुद केले होते त्यापूर्वी लोकमान्य टिळकांनी "गीतारहस्य" लिहून स्वातंत्र्य आंदोलनामागील तात्विक भूमिकेचे विवेचन केले होते. शिवाय कॉंग्रेस व अन्य राजकिय पक्षांनी वेळोवेळी जे ठराव संमत केले होते त्यात ही अशा स्वरुपाचे विचार आले होते परंतु या विषयाचा जेवढया गांभीर्याने अभ्यास व्हावयास पाहिजे होता तेवढा तो झाला नाही. त्याचे कारण, सर्वांपुढे असा विचार होता की, प्रथम इंग्रजांना घालवून घालवू या, त्यानंतर आपले घर कसे उभारावयाचे याचा विचार करता येईल." [३८]

"इंग्रज निघून गेल्यावर देशाचे राजकारण, समाजव्यवस्था, जीवनादर्श यावरील परकीय शासकांच्या विचारांचा पगडा खरे म्हणजे दूर व्हावयास पाहिजे होता. परंतु तो दूर होण्याऐवजी उत्तरोत्तर अधिकाधिक वाढतच चालला. तेथील वेशभूषा, रीतीरीवाज, भाषा, आदी गोष्टी आपल्या देशात आल्या. समाजशास्त्र नीतीशास्त्र, राज्यव्यवस्था, आदी विषयांतही त्यांचेच विचार आपल्या येथे प्रमाण मानले जाऊ लागले वेद, उपनिषदे, स्मृती, गीता आणि पुराणे यांच्याऐवजी मिल, हेगेल, ॲडमस्मिथ, कार्ल मार्क्स, एंजल्स यांची वचने आपल्याला प्रमाणभूत वाटू लागली. वस्तुत: प्रत्येक राष्ट्राने आपल्या "स्व" त्वाचा विचार करणे आवश्यक असते. स्वत्वावाचून स्वराज्याला काही अर्थच नसतो. आपल्या प्रकृतीला अनुसरून प्रयत्न करून सुखी व संपन्न जीवन जगता यावे यासाठीच तर प्रत्येक राष्ट्र स्वातंत्र्याची अभिलाषा धरीत असते. स्वत:च्या प्रकृतीशी विसंवादी असलेल्या विचारप्रणालीचा वा कार्यपध्दतीचा आधार घेणा-या राष्ट्रावर अनेक संकटे ओढवतात. आपल्या देशापुढील आजच्या संकटांची हेच प्रमुख कारण आहे." [३९]

"थोडक्यात म्हणजे शरीराबरोबरच मन, बुध्दी, आत्मा यांचे उपभोगाबरोबरच संयमाचे आणि समर्पणाचे, अधिकाराबरोबरच कर्तव्याचे, व्यक्तीबरोबरच समष्टी, सृष्टी

परमेष्टीचे, अखंड अवधान ठेवून चालणारे एकात्म सुख या "एकात्म मानव" दर्शनाला अभिप्रेत आहे. प्रयत्न करावयाचा आहे, पुरुषार्थ करावयाचा आहे तो हे सर्वांगीण सुख प्राप्त करण्याच्या दिशेने कारण त्यातूनच एकात्म मानव दर्शनाचे व्यक्तीची व समष्टीची समन्वित भौतिक व अध्यात्मिक उन्नती साधण्याचे ध्येय साकारणार आहे." [४०.]

"जनसंघाची एक राष्ट्रीयत्वावर दृढ श्रध्दा आहे. दीनदयाळजींनी जनसंघाच्या दृष्टिकोन स्पष्ट करताना म्हटले आहे, भारतीय जनसंघ बहुसंख्य व अल्पसंख्य या संकल्पना अमान्य करतो. एकाच संस्कृती असलेल्या राष्ट्रीयत्वावर त्याचा विश्वास आहे. एक देश, एक संस्कृती, एक राष्ट्र या सिध्दांताचा जनसंघाने स्वीकार केला आहे. काही ऐतिहासिक कारणांमुळे आपल्या देशातील काही लोक अलग झाले हे खरे, पण तो अलगपणा नाहीसा करणारे उपाय करावेत असे जनसंघाचे मत आहे, राष्ट्रीयत्व हे राजकीय देवाणघेवाणीतून निर्माण होत नाही तर समान निष्ठेतून निर्माण होते, असे जनसंघाला वाटते. कारण राष्ट्र ही चैतन्यमय कल्पना आहे जनसंघ उपासना व पूजा याचे स्वातंत्र्य मान्य करतो पण त्याच्या आधारावर विशेष हक्क मागण्याच्या व देण्याच्या पध्दतीस त्याचा विरोध आहे." [४१]

"राष्ट्र उभे राहण्याकरीता पाया लागतो राष्ट्रातील ज्या नागरिकांचे हितसंबंध, इतिहास व आंकाक्षा त्या भुमीशी आतशाय दृढपणे निगडीत असतात.. अशांचे जीवन हे राष्ट्रजीवनाचे स्वर असते व असे नागरिकच त्या राष्ट्राचा खरा आधार असतात. तुर्कस्थानचा इतिहास घ्या. क्रांतीनंतर तरुण तुर्कांना आपली संसद व सैनिकी संस्था निर्माण व इस्लाम्यावर आर्मेनियनांसाठी व खिस्तांसाठी उघडया कराव्या लागल्या. परंतु जेव्हा सर्बिया बरोबर युध्द झाले तेव्हा खिस्ती व आर्मेनियन्स धुम अनिश्चित राहीले व मग त्यांच्या ब-याच पलटणी सर्बियाकडे गेल्या. कारण वांशिकदृष्टया व धर्मदृष्टया त्याप्रमाणेच सर्बियाशी त्यांना अधिकजवळची बंधने वाटली. त्याप्रमाणेच ज्यांचा भूत, वर्तमान, व भविष्यकाळ हिंदुस्थानशी पितृभू व पुण्यभू म्हणून दृढपणे निगडीत झालेला आहे असे हिंदू लोक हिंदी राष्ट्राचा पाया, आधारशीला व राखीव सैन्य आहे म्हणून हिंदी राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने सुध्दा, हे हिंदूनो, हिंदुराष्ट्र दृढ व बलशाली करा." [४२]

वर्णव्यवस्थेबाबत आपले मत मांडताना पं.दीनदयाळ उपाध्याय म्हणतात, "समाज जीवनाच्या विविध आवश्यकतांपैकी या ना त्या आवश्यकता पूर्ण करण्यामध्ये सहभागी होऊन व्यक्तीस समष्टीधर्माचे पालन करता यावे आणि त्याचबरोबर स्वतःचाही विकास करीत तिला समाजसेवेसाठी अधिकाधिक समर्थ बनता यावे या दृष्टीने आपल्या येथे वर्णव्यवस्था उदयास आली.

फुले ते म्हणतात, वर्णव्यवस्थेत जे लोकश्रेष्ठ कनिष्ठ असा भेद पाळतात. ते ढाराेढार अंध आहेत, [ती] एकात्म व्यवस्था आहे संपूर्ण समाजाला सर्व प्रकारची भौतिक आणि अध्यात्मिक सुखे सुलभतेने प्राप्त करून देणारी ही व्यवस्था आहे. अर्थात शतकानुशतकांच्या दिर्घ कालखंडातून सामाजिक उत्थानपतनरूपी लाटांच्या आघातामुळे ही व्यवस्था आज दुर्बल झाली आहे. या व्यवस्थेचे दोष शोधू पाहणारांच्या मनात ही व्यवस्थाच समाप्त करण्याचा विचार यावा इतके दोष आज त्या व्यवस्थेत शिरले आहेत. या व्यवस्थेत आज अनेक विकृती शिरल्या आहेत आणि त्या विकृती आपल्याला दूर कराव्या लागतील हे अगदी खरे आहे." [४३]

"समाजचिंतन" पुस्तकात रमेश पतंगे राष्ट्रभावना जागृत करण्यासाठी सामाजिक समरसतेची आवश्यकता असण्याचे प्रतिपादन करतात, " समरसता हीच स्वातंत्र्याची आणि सामाजिक समतेची राजकीय/ आर्थिक लोकशाहीची हमी आहे. समरसता ही मानसिक प्रक्रिया आहे. स्वातंत्र्य समता या भौतिक संकल्पना आहेत. त्या कायद्याने साध्य करता येतात. समरसता कायदा करून निर्माण होणार नाही. ही एक मानसिक अवस्था आहे. एका माणसाला दुसऱ्या माणसांशी जोडणारी भावनिक संकल्पना आहे. समरसता किंवा बंधूभावना असेल तर आपण एकमेकांचे शोषण करू शकणार नाही.

दुर्बलांचे रक्षण कर्तव्य भावनेने करू. जातीगत विषमता आपण मानणार नाही. आपल्याच समाजातील कोणालाही आपण अस्पृश्य म्हणून हिणवणार नाही. हिंदू समाजात हिंदुत्वभाव जागृत करूनच समरसता निर्माण केली जाऊ शकते. आपण सर्व हिंदू आहोत, एका महान विचारधारेचे, जीवनमूल्याचे आणि जीवनपद्धतीचे वंशज आहोत, भारत आपली मातृभूमी आहे. आपण सर्व भारतमातेचे पुत्र आहोत, आमच्यात कोणी उच्च नाही, कनिष्ठ नाही, श्रेष्ठ नाही, आम्ही सर्व समान आहोत. हा भाव संस्काराने जागविता येतो." ४४

"माणसाला भाकरीइतकीच धर्माची आवश्यकता आहे. कारण धर्म माणसात नीती निर्माण करतो. सदाचार शील, करुणा, भूतमात्रांविषयी दयाभाव, धर्मच माणसात निर्माण करतो. चवार्कनीती आपल्याला अधिक पैसा खर्च करण्याची शिकवण देते. ऋण काढून सण साजरे करण्यास शिकविते. याचा अर्थ असा की, पैसा शिल्लक ठेवू नका तो सतत खर्च करीत रहा." ४५

डॉ.अरविंद गोडबोले यांच्या "सावरकर विचारदर्शन" या पुस्तकाच्या प्रस्तावनेत बाळासाहेब देवरस राष्ट्रबांधणी बाबत आपले मत स्पष्ट करताना म्हणतात, "विशिष्ट गुणांनी संपन्न,

अनुशासित समाज एकजुटीने जेव्हा राष्ट्रघडणीच्या कार्यात संमीलित होतो तेव्हाच ख-या अर्थाने स्वातंत्र्याची फळे चाखता येतात. देश स्वतंत्र झाल्याने कारावास, बलिदान, क्रांती आदी शब्दांचे आशय बदलले. हे लोकांनी ध्यानात घेतले नाही. स्वातंत्र्योत्तर काळात बलिदान करण्याची आवश्यकता नाही, परंतु बलिदानास आधारभूत असलेल्या सर्वस्वार्पण वृत्तीने राष्ट्र घडणीचे कार्य करावे लागते, ध्येयसिद्धीसाठी मृत्यूला आलिंगन देण्याची तयारी करण्याऐवजी हेतूप्रधान जीवन जगण्याची आवश्यकता आहे. केवळ स्वातंत्र्यप्राप्तीसाठीच नव्हे तर देशाच्या सर्वांगीण विकासासाठी रक्त, अश्रू, घाम, गाळावे लागतात, इत्यादी महत्वाच्या गोष्टींकडे सर्वसाधारण समाजाचे दुर्लक्ष झाले. समाजाचे नेतृत्व करण्याची क्षमता असलेले राजकीय नेते, विचारवंत, समाजधुरीण, शास्त्रज्ञ, समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या संदर्भात मौलिकचिंतन करीत नाहीत हे खेदजनक दृश्य सर्वत्र दिसते. या संदर्भात सावरकरांनी मौलिकचिंतन मार्गदर्शन केले आहे. याची माहिती फार कमी लोकांना आहे. सावरकरांचे अनुयायी म्हणविणा-यांनी देखील याकडे पुरेसे लक्ष दिले नाही. कारण सावरकरप्रणीत हिंदुत्वादाला पुरस्कार करताना केवळ राजकीय अंगाचाच प्राधान्याने विचार झाल्याने सत्तात्मक राजकारणातच त्यांची सर्व शक्ती खर्च होत आहे.

परंतु राजकारणाने समाजाचे मन घडत नाही व राष्ट्राचे चैतन्य [ Ethos ] जागृत होत नाही हे सत्य आहे या दृष्टीने रा.स्वं. संघ समाजावर राष्ट्रभक्तीचे संस्कार करुन राष्ट्रउभारणीच्या विभिन्न कार्यात स्वतःला झोकून देणारी जीवने घडवित आहे. परंतु सामान्य माणसांचा आवश्यक त्या प्रमाणात सहभाग लाभत नाही. ही कटू वस्तुस्थिती आहे. राष्ट्रजीवनात भयानक पोकळी निर्माण झाल्याने आपले राष्ट्र अत्यंत गंभीर परिस्थितीतून जात आहे व त्याचे स्वातंत्र्य, अखंडत्व व सार्वभौमत्व धोक्यात आले आहे. संकटाचे वादळ घोंघावत आहे सर्व समाजाची विशिष्ट सिद्धताझाल्याशिवाय यावर मात करता येणार नाही." [४६]

"परिवर्तन" या विशेषांकात राष्ट्रपुनर्निर्माण प्रक्रियेचे काही मुलाधार सांगितले आहेत ते असे :

" १] व्यक्तीच्या गरजांची परिपूर्ती

२] प्रत्येक हाताला काम

३] निष्कामतेला तिलांजली

४] स्त्रीला समाजात योग्य स्थान

५] व्यक्ती केवळ उपभोक्ता नाही म्हणजेच भौतिकसुखांसाठी आवश्यक आर्थिक सुखसाधने गोळा करण्याइतकाच मानवी जीवनाचा अर्थ सिमित नाही.

म्हणूनच आपल्या देशाला श्रेष्ठ असे वैभव प्राप्त करून देणे संघाचे उद्दिष्ट [परम् वैभवम् नेतुमेतद् स्वराष्ट्रम्] जुने ते सर्वच सोने नाही आणि जे जे पाश्चात्य ते ते सर्व उत्तम असेही नाही." [४७]

प्रा.स.ह.देशपांडे यांनी गोळवलकर गुरुजींच्या विचारांचाही सविस्तर परामर्श घेतला आहे.

"श्री.मा.स.गोळवलकर उर्फ गुरुजी हे १९४० पासून १९७३ साली त्यांचे निधन होईपर्यंत म्हणजे सुमारे ३३ वर्षे संघाचे सरसंघचालक आणि त्यापूर्वी काही वर्षे सरकार्यवाह होते. त्यांच्या दीर्घ कारकीर्दीतच संघ खऱ्या अर्थाने घडला व त्याला त्याचे आजचे रूप मिळाले असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. डॉ.हेडगेवार संघस्थापनेपासून [१९२५] ते त्यांच्या निधनापर्यंत [१९४०] म्हणजे फक्त १५ वर्षे सरसंघचालक होते शिवाय त्यातली पहिली काही वर्षे संघाच्या बाल्यावस्थेची धरली तर संघावर गुरुजींचा ठसा डॉ. हेडगेवारांच्या तुलनेने खूपच अधिक पडलेला असणार हे मान्य करावे लागेल. आणखी असे की डॉ. हेडगेवार हे काही रोखठोक व्यावहारिक सत्यांचाच उच्चार करीत, तात्त्विक विवेचन हा त्यांचा प्रांत नव्हता. उलट, संघाचे म्हणून जे काय तत्त्वज्ञान आहे त्याची मांडणी प्रथम गुरुजींनी केली असे म्हणावे लागेल गुरुजींच्या विचारांचा परामर्श घेताना ह्या गोष्टी लक्षात ठेवणे उपयुक्त होईल." [४८]

प्रथम मुस्लिम प्रश्नावर गुरुजींची मते काय होती ते पाहू.

"तुम्हाला हिंदू - वर्चस्व अभिप्रेत आहे, त्यासाठी तुम्ही घटनेच्या दुरुस्तीची मागणी करणार काय? " त्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी म्हटले होते, "कुणाच्याही वर्चस्वाचा प्रश्न नाही. आम्हाला एक निरोगी समाज हवा आहे आपले संविधान सर्वांना हक्क देते आणि त्यात दुरुस्ती करण्याची काही गरज नाही." "इस्लामला बुद्धिवादाच्या जवळ आणायला [ इन लाईन विथ रीझन ] वाल्मिकी, राम, कृष्ण हे सर्व आपले थोरपूर्वज आहेत असे का म्हणत नाहीत?" "हिंदूधर्मात असे काही लोक आहेत की जे राम आणि कृष्ण ह्यांना परमेश्वराचे अवतार मानीत नाहीत. पण ते थोर आणि अनुकरणीय पुरुष होते असे ते मानतात. मग मुसलमानांनी सुद्धा त्याचे देवत्व नाकारले तर काय बिघडले ? अशा व्यक्तींना आपले राष्ट्रपुरुष म्हणून त्यांनी का मानू नये ?" "आपण एकमेकांच्या उत्सवात का सहभागी होऊ नये ? ... होळीच्या उत्सवात मुसलमानावर थोडासा रंग उडाला तर कुणाच्या आज्ञा उल्लंघिल्या केल्या असे होते काय ? हा एक सामाजिक उत्सव आहे असे का मानू नये ? अजमेरच्या उरसाप्रमाणे इतर अनेक मुस्लिम उत्सवात हिंदू भाग घेत आले आहेत." "लोकांना खऱ्या इस्लामचे ज्ञान द्या., खऱ्या हिंदूधर्माचे ज्ञान द्या, सर्व धर्म मानवाला स्वार्थत्यागी, पवित्र आणि ईश्वरभक्त होण्याची शिकवण देतात हे त्यांना कळू द्या".

"पूर्वी मुस्लिमांनी आक्रमणे केली असली तर तसे स्पष्ट म्हणा,

आणि ते आक्रमक परदेशी होते आणि त्यांचा धर्म घेतल्या मुसलमानांशी काही संबंध नाही असे सांगा." जनसंघाचे "भारतीयीकरण" [इंडियनाइजेशन] म्हणजे सर्वांना [धार्मिक अर्थाने] हिंदू करुन घेणे असा नाही." ४९

" समान नागरी कायद्याच्या संदर्भात ऑर्गनायझर ला १९७२ साली दिलेल्या मुलाखतीत गुरुजींनी पुढील मते व्यक्त केली. "ह्या बाबतीत सुधारणावादी आणि मानवतावादी दृष्टिकोण असावा, पण सगळे काही सपाट करण्याचा यांत्रिक दृष्टिकोन असू नये. बहुपत्नीविवाह चांगला नाही अशा निष्कर्षाप्रत ते [मुसलमान] आले तर मला आनंद होईल, पण मी त्यांचे फक्त मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करीन". "ह्या संदर्भात युरोपियन देशांचा अनुभाव आपल्याला मार्गदर्शक नाही, कारण युरोपियन संस्कृती अलिकडची आहे, काल नव्हती आणि उद्याही कदाचित ती असणार नाही, उलट भारताची संस्कृती पुरातन आणि स्थिर आहे," असे सांगून ते पुढे म्हणतात की संविधानाच्या मार्गदर्शक भागात कायद्याची तरतुद असली तरी संविधान भारतीय अनुभावातून निर्माण झालेले नाही, आपले संविधान ही एक तुकडे जोड [ठिगळ जोड] आहे." हिंदू कायद्याचे संहितीकरणही [कोडिफिकेशन] राष्ट्रीय एकात्म्यासाठी आवश्यक नव्हते.

स्थानिक किंवा गटविशिष्ट असे कायदे किंवा रूढी अस्तित्वात असण्यास हरकत नाही "समानीकरण [युनिफॉर्मिटी] म्हणजे राष्ट्राची मृत्यूघंटाच होय; मला सर्व जीवनपद्धतीचे संरक्षण हवे आहे." दुसऱ्या एका मुलाखतीत बांगला देशाने "सेक्युलर" व्यवस्था स्वीकारावी पण निधार्मिक [इररिलीजस] होऊ नये असे त्यांनी सांगितले." [५०] गुरुजींच्या मते, "परम सत्याची प्राप्ती" हे जीवनाचे अंतिम ध्येय आहे. शिवाय अध्यात्म हा उत्कट नैतिक जीवनाचा आधार आहे. माणसाच्या मनात इतरांसाठी त्याग करण्याची; इतरांच्या दुःखात सहभागी होण्याची प्रेरणा का निर्माण होते याचे उत्तर भौतिकवादातून मिळत नाही हे उत्तर अध्यात्मशास्त्रात मिळते ते असे की, आपणा सर्वांच्या ठायी एक समान चैतन्य वास करीत आहे धर्माचा पाया मजबूत असेल तरच समाज संघटित होईल." गुरुजींचे हे विचार उद्धृत करून प्रा.देशपांडे पुढे लिहितात, "धर्माविषयी बोलताना गुरुजी जणू स्वाभाविकपणेच वैदिक धर्माविषयी बोलू लागतात. भारतीय परंपरेचा सर्वश्रेष्ठ आधार वेद होत. ते शाश्वत ज्ञान आहे. त्याच्या अध्ययनाने जीवनाच्या सर्व समस्या सुटून जगात सुख, शांती तेज वगैरे गुणांचा फैलाव होईल. सनातन धर्मावर श्रध्दा त्यांना हवी आहे. मानवी व्यवहाराच्या सर्व अंगोपांगाचे अधिष्ठान सनातन धर्मच आहे. साक्षात्कारी महापुरुषांचे उपदेश, विचार इत्यादींचे अध्ययन करावे, रामायण, महाभारत, उपनिषदे, रामकृष्ण, विवेकानंद, ह्यांचे वाङ्मय वाचावे असा आपल्या पत्रातून अनेक ठिकाणी ते उपदेश करतात." [५१]

शासन आणि धर्म ह्यांच्या परस्परसंबंधाबाबत गुरुजींची भूमिका स्पष्ट करताना प्रा.देशपांडे लिहीतात, "गुरुजींची भूमिका फक्त धर्मनिरपेक्षतेची नसून ती सर्वधर्मसमभावी आहे. प्रत्येक धर्माच्या मुक्त विकासाला वाव आणि संधी आणि एका धर्ममताने दुसऱ्यावर कुरघोडी करण्यास प्रतिबंध म्हणजे "सेक्युलॅरिझम" अशा राज्याला धारे म्हणजे "बहुसांप्रदायिक" म्हणजे अधिक उचित आहे. गुरुजींनी अन्यधर्मीयांना जी पत्रे लिहिली आहेत. त्यांत सर्वधर्मसमभावाचाच पुरस्कार आहे. कोणत्याही धर्मातील सण व उत्सव हे पवित्र असतात. भागवंताची भक्ती उत्कटतेने करण्यास ते प्रेरणा देतात म्हणून होळी, ईद यासारखे सण सगळ्यांनीच पाळावेत. लोकांना खराखुरा इस्लाम, खराखुरा हिंदुधर्म समजावून सांगितला पाहिजे सर्वच धर्म माणसाला निःस्वार्थी, पवित्र आणि मंगल, सत्प्रवृत होण्याची शिकवण देतात. सर्वधर्मसमभावाच्या संदर्भात शृंगेरीपीठाचे शंकराचार्य भारती ह्यांची एक गोष्टी गुरुजींनी सांगितली आहे. ती विशेष लक्षात घेण्यासारखी आहे. आचार्यांकडे एक अमेरिकन माणूस "मला हिंदू करुन घ्या" असे सांगण्यासाठी आला. तेव्हा आचार्यांनी त्याला असे सांगितले की, तु प्रथम खिस्ती धर्माचे प्रामाणिकपणे पालन कर, तसे करुनही ही तुझी अध्यात्मिक भूक शमली नाही तर माझ्याकडे ये."[५२]

प्रा.देशपांडे पुढे लिहितात, "पाश्चात्यवाद आणि भौतिकवाद, जडवाद, भोगवाद, ह्या सर्वांना गुरुजी एकच समजतात आणि ह्या सर्वांबद्दल प्रतिकूल विधाने करतात. साम्यवाद व लोकशाही ह्यांचा जन्मही भौतिकवादातून झाला आहे. पाश्चात्य जीवन बहिर्मुख आहे. तेथे जास्तीत जास्त सुखोपभोग हेच जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आहे. मनावर निरंकुश प्रभुत्व गाजविण्यास सर्व इंद्रियांना मोकाट सोडावे आणि, अशाप्रकारे मनुष्य पशुवृत्तीचा गुलाम बनावा हे व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेचे सूत्र आहे. पाश्चात्यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रातील इतिहासातून स्फूर्ती घेणे हे "गुलाममनोवृत्तीचे" लक्षण आहे. गीतेच्या १६ अध्यायात दैवी आणि आसुरी संपत्ती ह्यांचे वर्णन आहे. त्याप्रमाणे पश्चिमेची प्रवृत्ति आसुरी आहे. आपल्या भारतीय जीवनाचा आधार चतुर्विध पुरुषार्थ हा आहे. जगात बंधुभाव व शांतता निर्माण करण्यासाठी चतुर्विध पुरुषार्थाचा संदेश आपण सर्व जगाला दिला पाहिजे त्याला पर्याय नाही."[५३]

गुरुजींच्या सामाजिक विचारांचा परामर्श घेताना प्रा. देशपांडे लिहितात, "ह्या विचारांचा मूलाधार म्हणजे संघप्रणालीत सतत गुंफत धरलेला व्यक्ति समष्टी संबंध आहे. व्यक्तिपेक्षा समष्टी श्रेष्ठ आहे ही गुरुजींची नेहमीची शिकवण आहे. समष्टीला "अंगभूत वैशिष्टय" असते. समाज हाच परमेश्वर असे ते मानतात. समाज हे एक "जीवमान शरीर" आहे. प्रत्येक व्यक्ती समाजपुरुषाचा एक "अवयव" आहे. हा व्यक्तीसमष्टी संबंध

अर्थातच वर्णव्यवस्थेत साकार झाला आहे. वर्णव्यवस्था हे भारताचे खास वैशिष्टय आहे. आज तिला जातीवादाचे रुप आले आहे. वस्तुत: वर्णव्यवस्थेत भेदभाव अभिप्रेत नाही. अभेदवृत्तीने एकमेकांना सहाय्य करणे हे तिचे मूळ स्वरुप आहे. आज जाती संस्थेचेही अध:पतन झालेले आहे. जातीयता ही विकृती आहे अशारितीने आपला समाज समन्वय व सहकार्य यावर आधारलेला आहे. उलट पाश्चात्य समाज स्पर्धेवर आधारलेला आहे. आपल्याकडे बंधूभाव आहे. तर पाश्चात्यांची समाजरचना कराराच्या तत्वावर [ सोशल कॉन्ट्रॅक्ट थिअरी] झालेली आहे." ५४

पददलितांविषयीचा गुरुजींचा दृष्टीकोन विशद करताना प्रा.स.ह.देशपांडे म्हणतात, "आर्थिक उन्नतीचे प्रयत्न सर्वात खालच्या समाज स्तरापासून सुरु केले पाहिजेत. कुणीही उपेक्षित किंवा निराश्रित राहता कामा नये. अनिष्ट व कृत्रिम भेद नष्ट झाले पाहिजेत. खरा समाज ग्रामीण भागात आहे. दु:खितांची सेवा केली पाहिजे हे सर्व तत्वे असे गुरुजींना वाटते. मात्र त्या प्रश्नाचे विश्लेषण व त्यांवरील उपाययोजना त्याबाबत गुरुजींचा दृष्टीकोन स्वतंत्र आहे उदा. धार्मिक विषमता हे वर्ग विद्वेषाचे खरे कारण नाही.

आपण वेगवेगळ्या वर्गांना वेगवेगळा दर्जा देतो; हे आणि शोषक व शोषित असे वर्गीकरण चुकीचे आहे. मालक व कामगार हे दोघेही ग्राहकांना लुबाडतात. महार समाजाच्या पुढा-यांशी चर्चा चालू असताना पुढा-यांनी धार्मिक भोग्भातांचा उल्लेख केला आणि यज्ञोपवीत इत्यादींची मागणी केली. यज्ञोपवीत व गोत्र देता येईल असे गुरुजींनी सांगितले व जुन्या पद्धतीला अनुसरून काश्यप गोत्राची शिफारस केली वनवासी बंधूच्या उपेक्षेला "समाजव्यवस्था कारणीभूत आहे" हे म्हणणे त्यांच्या मते चुकीचे आहे. हरिजनांवर अत्याचार होत असल्याच्या अनेक बातम्या चुकीच्या असतात आणि बातम्यांमागे "कोणाचा तरी" हात असतो. अस्पृश्यता घालविण्यासाठी लढाऊ मार्गाचा अवलंब नसावा. संततीनियमन फक्त सुशिक्षितच करतात. त्यामुळे एकूण समाजाच्या "गुणवत्तेचा दर्जा" घसरतो ही त्यांची तक्रार विविध समाजस्तरांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन सूचित करते."[५५]

संघाचे बौद्धिकप्रमुख राहिलेले श्री.मा.गो.वैद्य लिहितात, "मी ज्या छोटेगावात राहतो, त्या गावच्या तीन हजार लोकसंख्येपैकी कमीत कमी दोन हजार लोक तेलीजातीचे आहेत. पण गावात एकही तेलघाणी नाही, आजही नाही, असे नाही. गेल्या साठ वर्षांपासून नाही, हे मला माहित आहे.

तेलंगाणी नाही, पण तेली आहेत. जातिव्यवस्था कालबाह्य झाल्याचे हे प्रमाण आहे. पण "जातिभेद" आहे की नाही ? तो आहे. जातीचा अहंकारही आहे. आणि निवडणुकीच्या राजकारणाने तो पोसला जात आहे." [५६]

"जातिभेदाने ग्रासलेल्या हिंदू समाजाचे संघटन संघाला करावयाचे आहे. त्याने त्यासाठी आपली एक व्यूहरचना ठरविली त्या व्यूहरचनेचे आधारसूत्र "जात" लक्षात घ्यावयाचीच नाही हे आहे. ज्या हिंदू समाजाच्या या जाती आहेत; त्याचे हिंदुत्वच तेवढे प्रकर्षाने व आग्रहाने मांडायचे ही संघाची रीत आहे. या व्यूहरचनेची इष्ट फळे मिळाली आहेत. जातीची भावना संघपरिवारात बोथट झाली आहे. आंतरजातीय विवाह घडत आहेत. नव्हे, अशा विवाहितांचे उभयबाजूंनी सात्म्य [असिमिलेशन] घडून येत आहे. जातिनिर्मूलन श्रेष्ठ की जातिभावनानिर्मूलन श्रेष्ठ, यासंबंधी वाद घालता येईल. "जातिनिर्मूलन" हेच जातिभावनानिर्मूलनाचे उद्दिष्ट आहे परंतु कोणाला "जातिनिर्मूलनच" तात्काळ शक्य वाटत असेल तर त्याने त्यासाठी प्रयत्न करण्याला संघाचा विरोध नाही ज्या समाजाचे संघटन करावयाचे आहे त्याच्या गुणदोषांची संघाला परिपूर्ण कल्पना आहे त्याला एकरस व एकात्म बनवायचा आहे पण त्यांच्या दोषांचेच सतत आविष्करण करीत राहून त्याचा सतसत तेजोभंग करणे संघाला मान्य नाही.

उठता बसता टोमणे देण्याने ना व्यक्तीत सुधारणा घडून येत, ना समाजात, अशी संघाची धारणा आहे. संघाच्या या कार्यपद्धतीचा "पिपीलिकागती" म्हणून आक्षेप कुणाला करायचा असेल, तर तो करू शकतो. परंतु या शैलीला, जातिव्यवस्थेचे समर्थन आणि त्या व्यवस्थांची वांछनीयता अभिप्रेत आहे, असे प्रतिपादन करणे हे अन्यायकारक आहे."[५५]

गुरुजींची स्त्रीविषयक मते प्रा. देशपांडे यांनी पुढे मांडली आहेत. ,सीता, सावित्री, पद्मिनी, निवेदिता, हे भारतीय संस्कृतीतील स्त्रीत्वाचे आदर्श आहेत. स्त्रियांचे समान हक्क आणि पुरुषजातीच्या वर्चस्वाखालून स्त्रियांची मुक्तता त्या सारख्या घोषणा ऐकू येत आहेत, आणि इतर अनेक वादांच्या मालिकेत स्त्रीपुरुष वादाची भर पडली आहे. गुरुजींच्या मते घटस्फोट "अधर्म्य" आहे. स्त्री मातेसमान हे आपल्या संस्कृतीचे खास वैशिष्टय आहे. "विचारधन" ग्रंथातील एक प्रकरण "मातृशक्तीला [स्त्री शक्तीला नव्हे] आवाहन" असे आहे. आणि त्यांत मुलांवर धार्मिक, सांस्कृतिक, नैतिक आणि राष्ट्रीय संस्कार करावेत एवढेच आवाहन आहे. हुंडयाच्या प्रश्नाबद्दल उत्तरप्रदेशातील एका स्वयंसेवकाने गुरुजींकडून "आदेश" मागितला होता, असे दिसते. त्याला पाठविलेल्या उत्तरात गुरुजी सुरवातीला त्या प्रश्नाबद्दल नापसंतीचा सूर काढतात.

योग्य वर शोधण्याचे कामदेखील बाजारात चांगली वस्तू शोधावी त्याचप्रकारे केले जाते. पुढे असे धाडू नये त्याबद्दल सगळ्यांचे एकमत, पण स्वतःवर कृतीचा प्रसंग आला म्हणजे सगळे तत्त्वज्ञान विसरून जातात. आणि टीकाही ते इतरांवर करतात. माझा पुढे म्हणतात, या प्रथेचे निर्मूलन करण्यासाठी आपण लोक फारसे काही करू शकत नाही, आपल्या संघाशी संबंधित लोक फार थोडे आहेत. त्यापेक्षा शेकडोपटीने अधिक समाज संघाच्या बाहेर आहे तो समाज प्रथम ऐकत असेल तर सत्तारूढ राजकीय नेत्यांचे, नंतर साधू, संन्याशी वगैरे धार्मिक क्षेत्रातील थोर पुरुषांचे. मी तर राजकारणापासून दूर आहे अधिकारी होण्याची माझी पात्रता नाही आणि मी संन्यासीही नाही तेव्हा कोणत्या अधिकाराने मी कोणाला आदेश देऊ शकेन ? आणखी महत्त्वाची गोष्ट ही आहे की संघकार्यात चांगले वातावरण निर्माण करून लोकांना चांगला व्यवहार करण्याची प्रेरणा देण्याची योजना आहे. आदेश देऊन कोणावर बळजबरी करण्याची नाही. गुरुजींच्या स्त्री संबंधित आणखीही एक विचार केवळ लक्षणीय आहे.! तो ठेंगडी यांनी उद्धृत केला आहे; "ज्यांची कामशक्ती स्वाभाविकच अधिक आहे त्यांना ही एक पत्नीव्रताच्या साच्यात राहण्याची जबरदस्ती करणे उचित होणार नाही असे केल्यास समाजातील नैतिक संतुलन बिघडेल. [म्हणजे पुरुष वेश्यागमन करतील असा अर्थ दिसतो- स.ह.दे]

परंतु नीतीमत्तेच्या बाबतीत मात्र कठोरपणा असला पाहिजे." [५८]

"गुरुजींच्या मनाची ठेवण ध्यानात येण्यासाठी आणखी गोष्टींचा उल्लेख अवश्य आहे. त्यांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. मंत्रशक्तीवर विश्वास आहे, उदा."रामरक्षा" हा "मंत्र" आहे. त्याचे भाषांतर केले तर त्याची मंत्रशक्ती निघून जाते. मानसिक स्वास्थ्यावर उपचार म्हणून रक्षाचा पाठ करावा आणि "अभिमंत्रित जलाने" त्यावर सिंचन करावे. सामुहिक भजन, नामसंकीर्तन, सद्ग्रंथपाठ इत्यादी गोष्टी नियमाने कराव्यात. गोमांस औषधाच्या रुपाने पोटात गेले तरी परंपरा धर्मभ्रष्ट होते व समाजसंस्कृतीहीन बनतो. मुंज म्हणजे एक महत्वाचा संस्कार आहे असे गुरुजींना वाटते." [५९]

समाजातील वर्गरचना, विविध वर्गांचे परस्पर संबंध याबाबत भूमिका घेताना संघविचारात साम्यवादावर कठोर टिका होत असल्याचे गंगाधर इंदूरकर दाखवून देतात, "भारतातील कम्युनिस्ट म्हणविणारे बाह्य मतप्रणालीला बळी पडून आपल्या देशाचे नुकसान करीत आहेत असे तर गुरुजींना वाटत होतेच. वर्गविग्रहावर उभी असलेली; "आहेरे" आणि "नाहीरे" यामध्ये संघर्ष घडवून वर्गव्यवस्थेचा नाश करुन वर्गरहित समाजाची कल्पनाही त्यांना योग्य वाटत नव्हती. ते एके ठिकाणी म्हणतात, "भारतात अशी काय भयंकर विषमता आहे? आपल्याकडील काही पुंजीपतींचे धन हे

जगातील धनिकांच्या तुलनेने नगण्य आहे. येथे धनवानांपासून निर्धनांपर्यंत एकशिडीच असलेली आढळेल. तेव्हा समाजात दोन स्पष्ट वर्ग आहेत असे सांगणे हे सर्वसामान्य जनतेला भ्रमात पाडण्यासारखेच आहे. समाजाचे दोन वर्गात तुकडे पाडण्याचया पद्धतीचा हा परिणाम आहे. आजपर्यंत जसा मुस्लीम आणि बिगरमुस्लीम आदी शब्दांचा वापर झाला त्याचप्रमाणे परकीय घोषा वाक्यांच्या आधारावर हे भेद निर्माण केले जात आहेत. दोन वर्ग आणि त्यातील संघर्ष अटळ नाही व अशा संघर्षातून वर्ग नष्ट करुन वर्गविहीन समाज निर्मिती ही संभावनीय नाही." कम्युनिझम स्वीकारल्याने सर्व समान होतील, कुणाचा कुणाशी झगडा राहणार नाही, राज्यसत्तेचीही फारशी गरज राहणार नाही. अशी विचारसरणीही मांडली जात आहे. ती ही श्री.गुरुजींना मान्य नव्हतीक ते म्हणात, "मनुष्याचा स्वभाव सर्वसाधारण जीवमात्रांहून अधिक चतुर आहे. आपले पोट भरल्यावर तो दुसऱ्याची भाकरी पळविणार नाही ही गोष्ट खरी नाही. गाय - बैल यांच्यापुढील गव्हाणीत बसलेला कुत्रा जसा स्वत:ही गवत खात नाही व दुसऱ्यालाही खाऊ देत नाही. त्याप्रमाणे दुसऱ्याच्या सुखात हस्तक्षेप करण्याची माणसाला चटक असते हे विसरुन चालणार नाही तर समाजात सत्ताच उरली नाही तर तो विरोध न करता का राहील. मनुष्य हा विकारांना बळी पडणारा प्राणी आहे.

तसेच विकार तृप्त करावयास जावे तर ते प्रबळ होत असतात. अशा स्थितीत मनुष्य दुसऱ्याशी स्नेहयुक्त व्यवहार कसा करील ? मनुष्याचा स्वभाव विचारात घेता तो समानता निर्माण झाल्यावरही पुन्हा विषमता निर्माण करील व पुन्हा क्रांतीची आवश्यकता पडेल. क्रांती, क्रांती, क्रांती व सतत इन्किलाब झिंदाबादच्या घोषणा करीत असतात. पण क्रांती अगर शांती चिराऊ कशी व्हावी ? सदासर्वकाळ क्रांतीची ललकारी मारीत राहणे म्हणजे सारखा संघर्ष अशांती आणि अव्यवस्था यांना निमंत्रण देण्यासारखे आहे. इन्किलाब झिंदाबाद हा शब्दप्रयोग माणसाला शोभण्यासारखा नाही."[६०]

तात्त्विक विचार या दृष्टीने जगात ही कम्युनिझमची बरीच पीछेहाट झाली आहे. नोव्हेंबर १९८१ मध्ये, पुणे "तरुण भारतात प्रसिद्ध झालेल्या श्री.दत्तोपंत ठेंगडीच्या मुलाखतीत त्यांनी मांडलेला विचार ही उद्बोधक आहे ते म्हणतात, "मार्क्सीय मार्गदर्शक सिद्धांत कोणतेही कम्युनिस्ट शासन साकार करू शकले नाही. कम्युनिस्टशासित देश राष्ट्रवादी झाले असून राष्ट्रवादाने तथाकथित आंतरराष्ट्रीयत्वावर मात केली आहे. प्रत्येक कम्युनिस्ट पार्टी स्वतःच्या राष्ट्रीय संस्कृती - परंपरांशी नाते जोडते आहे. राष्ट्रीयत्वाला प्राधान्य दिल्यामुळे विभिन्न कम्युनिस्ट जगाच्या कल्पनेला मूठमाती मिळाली आहे. प्रत्येक कम्युनिस्ट देश दुसऱ्या कम्युनिस्ट देशाला सुधारणावादी व वाट चुकलेला [रिव्हिजनिस्ट आणि डेव्हिएशनिस्ट] ही संज्ञा देऊन दूषण देऊ लागला आहे.

मार्क्सवाद म्हणजे काय ? यावरच मार्क्सवाद्यांत रणे माजली आहेत. आपल्या देशातही आपल्याला कम्युनिस्ट हे लेबल लावून घेणारे निदान वीस एक तरी गट आहेत." [६१]

सेनाच्या तत्त्वज्ञानावर टीका
---

राष्ट्रवादाबाबत जयप्रकाश नारायण यांनी "नेशन बिल्डिंग इन इंडिया" या पुस्तकात रविंद्रनाथ टागोर व महात्मा गांधी यांचे दृष्टिकोन स्पष्ट केले आहेत. रविंद्रनाथ टागोरांना आक्रमक राष्ट्रवाद हा दुष्ट प्रवृत्तींना खतपाणी घालू शकतो असे वाटत असल्यामुळे त्यांनी आंतरराष्ट्रवाद हे त्याहून उदात्त असे ध्येय स्वीकारले व विश्वबंधुत्वाचा पुरस्कार केला. महात्मा गांधी स्वतःला राष्ट्रवादी म्हणून घेत असत. पण त्यांचा राष्ट्रवाद संकुचित वा आक्रमक नव्हता. जयप्रकाश नारायणांच्या मते, आता आपण ज्या परिस्थितीत आहोत व राष्ट्रवादाचा अवलंब ज्या रितीने करीत आहोत त्यातून समस्या सुटण्यापेक्षा नव्या निर्माण होण्याचीच शक्यता अधिक आहे. त्यांनी दिल्लीला भेट दिली असता तेथील प्रत्येकच जण पाकिस्तानशी युद्ध करण्याच्या गोष्टी करतो आहे. संपूर्ण राजधानी ह्याच उन्मादाने भारून गेलो आहे असे त्यांना जाणवले. पाकिस्तानशी खरेच युद्ध झाले तर आपला सरहद्दीचा प्रश्न सुटणार आहे का ? आपल्या आर्थिक योजनांचे काय होणार ? आपली अलिप्तता व लोकशाही यांचे काय होणार ? आपल्या अहंभावामुळे आपण अशा आत्मघातकी युद्धात ओढले जाऊ नये हे पाहण्याची गरज आहे." [६२]

हिंदुराष्ट्राच्या संकल्पनेबाबत जयप्रकाश नारायण म्हणतात, " या कल्पनेमुळे काही अपरिपक्व मनांना आकर्षून घेतले तरी संपूर्ण राष्ट्राच्या एकात्मतेच्या दृष्टीने आणि हिंदू समाजाच्याही दृष्टीने, ही संकल्पना अत्यंत घातक आहे.

ही बाब हिंदूराष्ट्राचा उद्‌घोष करणाऱ्यांच्या लक्षात येत नाही. त्याप्रमाणे देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी येथील विविध धर्माच्या लोकांच्या प्रयत्नांची एकत्रित आवश्यकता होती. तशीच आवश्यकता आज राष्ट्राचे सामर्थ्य वाढविण्यासाठी व राष्ट्राचा विकास घडवून आणण्यासाठी ही आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंदुराष्ट्राचा प्रमुख पुरस्कर्ता असल्यामुळे राष्ट्रीय एकात्मता परिषदेच्या श्रीनगरमधील बैठकीबाबत संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीची प्रतिक्रीया लक्षणीय आहे. एका ठरावाद्दारे जाती धर्म, भाषा, राजकीय पक्ष ह्या सर्वाच्यां वर उठू शकणारा सुसंघटीत असा हिंदूसमाजच खऱ्या राष्ट्रीय एकात्मतेसाठी पायाभूत ठरु शकतो अशी भूमिका घेतली आहे. एखादया समाजाने संघटीत व्हावे ह्यासाठी कोणी हरकत घेण्याचे काहीच कारण नाही. फक्त त्यातून अन्यसमाजाप्रती परात्मभाव, विघटनवादी प्रवृत्ती, जमातवादी राजकारण किंवा दुसऱ्या या समाजावर वर्चस्व गाजविण्याची वृत्ती वाढीस लागणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. पक्षांच्या वर उठू शकेल असा सुसंघटीत हिंदूसमाज म्हणजे संघाला नेमके काय अभिप्रेत आहे? असा प्रश्न पडतो ! जर सर्व हिंदूंनी केवळ हिंदू असल्याकारणाने एकच पक्षाचे असावे असा त्याचा अर्थ असेल तर ते फारच घातक आहे. "मुस्लिम असाल तर मुस्लीमलिग मध्ये या"घोषणेची या संदर्भात आठवण होते. याच पद्धतीने प्रत्येक समाजाने आपापला पक्ष स्थापन करावयाचे ठरविल्यास राष्ट्राची राजकीय एकता अशक्य कोटीतील गोष्ट ठरेल." [६३]

" आपल्या राष्ट्रीयतेचा आदर्श ठरेल अशी एकात्मता साधण्यापासून आपण कैक योजने दूर आहोत. केवळ भावनेला आवाहन करुन मोठया मोठया घोषणा देऊन अगर आपसात भांडत राहून या समस्येला हात घालता येणार नाही. राष्ट्रबांधणीच्या कामात पराकोटीचा संयम, सहनशीलता, आणि परस्परांचे मन वळविण्याची व सांभाळण्याची वृत्ती आवश्यक आहे. त्यात आदर्शवादाची व स्वार्थ त्यागाची गरज आहे. ह्यासाठी आपले आयुष्याचे मोल देण्याची वेळ आली तर आपण महात्मा गांधीप्रमाणे तेही केले पाहिजे आपल्याला जमातवादी समस्या धारोधार संपवायची असेल व त्यासाठी आपले प्रामाणिक प्रयत्न करण्याची तयारी असेल तर सामंजस्य प्रस्थापित करण्यात कोणतीही अडचण येणार नाही."[६४]

हिंदू जमातवादाविषयी आपले मत व्यक्त करताना जयप्रकाश नारायण म्हणतात, "भारत हा अनेक धार्मिक संप्रदायांचा देश असल्यामुळे प्रत्येक धर्माच्या लोकांचा अगदी स्वतःचा असा जमातवाद तेथे आढळतो. मात्र या सर्वात हिंदू जमातवाद अधिक घातक आहे. त्यामागचे मुख्य कारण भारतातील लोकसंख्येत हिंदू प्रचंड मोठया संख्येने असल्याने हिंदूचा जमातवाद हा राष्ट्रवाद म्हणून वापरण्याचा आणि त्याला होणारा सर्व प्रकारचा विरोध राष्ट्रविरोधी ठरवला जाण्याचा धोका असतो.

रा.स्वं.संघासारख्या संघटना भारतात "हिंदूराष्ट्र" ठरवून ही गोष्ट उघड उघड करतात. अन्य कोणी हीच गोष्ट उघड पणे नजरेत भरणार नाही अशा रीतीने करतात. पण दोन्हीही प्रयत्नांत ह्या देशात विघटनवादी प्रवृत्ती वाढीस लावण्याची क्षमता आहे. भारत हे हिंदूराष्ट्र आहे हे समीकरण अन्य समाज घटकातील दुय्यम नागरिक ठरवू लागले तर ते त्यांना सहन होणार नाही अशी परिस्थिती सतत संघर्षमय आणि अंतिमत: विनाशाकडे जाणार असेल, ज्यांना भारत हा हिंदुशी व भारतीय इतिहास हा हिंदू इतिहासाशी एकरूप ठरवायचा आहे ते भारतात त्याच्या प्राचीन वारसाला पारखे ठरत आहेत. वस्तुत: त्याच व्यक्ती हिंदूधर्म व हिंदूलोक ह्या दोघांचे खरे शत्रू आहेत. ते ह्या उदात्त धर्माची सहिष्णुता व सुसंवादाची भावनाच केवळ नष्ट करत नाहीत तर ह्या संपूर्ण देशाचा पायाच खिळखिळा करतात. आणखीही एका रीतीने हिंदू जमातवादी ज्या समाजाचा कैवार घेण्याचा आव आणत असतात. त्याच समाजाचं नुकसानही करत असतात. मुळातच उच्च-नीच मानल्या गेलेल्या जातींमध्ये विभागलेला हिंदू समाज जमातवादाने पेटून उठल्यास हिंदू समाजाअंतर्गत वेगवेगळ्या जातींनांही परस्परांविरुद्ध झुंजवण्यास कारणीभूत ठरेल."[६५]

जयप्रकाशजी पुढे म्हणतात, "गांधीजींच्या हत्येनंतर संघावर बंदी आल्यावर संघ सांस्कृतिक संघटनाच आहे. ह्या दाव्याविरुद्ध खूप ओरड झाली पण पुढे निधर्मी संघटनांचे काहीच भय न उरल्यामुळे धिटावलेला संघ सांस्कृतिक संघटनेचा बुरखा फेकून देऊन भारतीय जनसंघामागचा खरा शक्तीस्त्रोत म्हणून वावरू लागला. जनसंघाने संघाशी असलेले नाते तोडल्याखेरीज त्याचा धर्मनिरपेक्ष असण्याचा दावा कधीही गांभीर्याने घेतला जाणार नाही किंवा दुसऱ्या बाजूला संघ जोपर्यंत जनसंघावर अंकुश ठेवण्याच्या स्थितीत आहे. तोपर्यंत त्याचा एक सांस्कृतिक संघटन असल्याबाबतचा दावाही फोल ठरेल, रा.स्व. संघाला खरोखरच जर भारताचे हित साधायचे असेल तर संकुचित अशा हिंदूसंघटनेऐवजी एक व्यापक पायावर उभी भारतीयांची संघटना बनविण्याचा प्रयत्न संघाने करायला हवा. सर्व संप्रदायांच्या व्यक्तींना संघात प्रवेश दिला जाण्याची व त्यांना भारताचे सुयोग्य नागरिक बनवण्यासाठी योग्य असे प्रशिक्षण दिले जाण्याची आवश्यकता आहे, संघाने हा बदल केल्यास संपूर्ण भारतीयांना त्याबद्दल कृतज्ञता वाटेल, याउलट संघाने सध्याचेच राजकारण चालू ठेवल्यास ते हिंदू धर्म व राष्ट्राच्या पायालाच सुरूंग लावतील."[६६]

"धर्मनिरपेक्षतेचे तत्व राष्ट्राचा आधार असले पाहिजे आणि जनतेच्या आशा आकांक्षाचा विचार करुन राजकीय व्यवस्थेची पुनर्रचना झाली पाहिजे यावर जयप्रकाश नारायणांचा कटाक्ष आहे." [६७]

डॉ. रावसाहेब कसबे यांनी "झोत" या पुस्तकांत एकूणच संघाच्या तत्वज्ञानावर टीका केली आहे. व संघाचा राष्ट्रवाद तपासण्याची गरज आहे असे सांगताना ते म्हणतात, " आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भगव्या झेंड्यांला अर्धी चड्डी घालून अर्धा सलाम करणारे सर्वच स्वयंसेवक चातुर्वर्ण्याधिष्ठीत विषम समाज व्यवस्थेचा आणि हिंदूधर्मप्रणीत स्त्रीदास्याचा पुरस्कार करणारे असतील असे नाही. त्यांच्यापैकी बहुसंख्यांना त्यांचे वय लक्षात घेता केवळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या राष्ट्रवादाचे आकर्षण असावे असे वाटते. संघाचा राष्ट्रवाद हा पूर्ण हिंदू राष्ट्रवाद आहे आणि हिंदू राष्ट्रवाद हा चातुर्वर्ण्यव्यवस्थेचा पुरस्कर्ता असल्याने ब्राह्मण वर्ग वर्चस्वावर उभा आहे. तो राष्ट्रवाद नसून जातीयवाद आहे हे ज्यावेळी त्यांच्या ध्यानी येईल त्या वेळी त्यांच्या प्रतिक्रीया पाहण्यास व अभ्यासण्यात मला आनंद होईल म्हणून या इतिहासाची प्रत्येक शाखेवार चर्चा करण्याची तयारी संघाने दर्शविली पाहिजे." [६८]

" राष्ट्रप्रेम आणि धर्म यांचा आधुनिक काळात खूप विचार विचार झालेला आहे.

म.फुले, आगरकर, डॉ.लोहिया, पं.नेहरू, डॉ.आंबेडकर यांच्यासारखी माणसे जशी राष्ट्रप्रेमी असू शकतात. तशीच धार्मिक वृत्तीचीही माणसे ही राष्ट्रप्रेमी असू शकतात. हे ऐतिहासिक सत्य हिंदुत्ववादी मान्य करायला तयार दिसत नाहीत. राष्ट्रवादाची, अतिशय मूलगामी स्वरूपाची चर्चा आचार्य जावडेकरांनी त्यांच्या "आधुनिक भारता" त केलेली आहे. प्रसिद्ध बुद्धिवादी विचारवंत आगरकर यांच्या राष्ट्रवादाला जावडेकरांनी "विवेकनिष्ठ राष्ट्रवाद" असा शब्दप्रयोग केलेला आहे. न्या. रानडे यांच्यापासून जयप्रकाश नारायण यांच्यापर्यंतच्या अनेक नेत्यांना हा विवेकनिष्ठ राष्ट्रवाद मान्य होता असे दिसते. विवेकनिष्ठ राष्ट्रवादाची संकल्पना आणि आक्रमक राष्ट्रवादाचा विचार जर आपण समजावून घेण्याच्या मनःस्थितीत असू तर आपल्याला हे स्पष्ट होण्यास हरकत नसावी की, विवेकनिष्ठ राष्ट्रवादी विचार हा धर्मनिरपेक्ष असतो, त्याचप्रमाणे तो सामाजिक, आर्थिक समतेचा म्हणजेच समाजवादाचा पुरस्कार करणाराही असतो. समाजात हरेक प्रकारची विषमता तशीच ठेवून व चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा पुरस्कार करून किंवा धर्माच्या आसऱ्याने भावनात्मक आवाहने आणि आव्हाने करून राष्ट्रनिर्मिती होत नसते तर त्यासाठी जाती धर्माच्या पलीकडे जाऊन सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समतेच्या पायावर समाज उभा केल्यानेच राष्ट्र निर्माण होऊ शकते, हे विवेकनिष्ठ राष्ट्रवादाचे एक सूत्र आहे या विवेकनिष्ठ राष्ट्रवादाचे अध्यात्माशी भांडण असल्याचे कोणतेच कारण नाही परंतु उघड उघड शोषणाला मदत करणाऱ्या धार्मिक आणि जातीय अभिनिवेशांच्या आणि सांप्रदायिक आग्रहांच्या मात्र हा राष्ट्रवादी विचार निश्चितच विरोधी आहे.

या विवेकनिष्ठ राष्ट्रवादावर निष्ठा असणाऱ्या व समाजवाद आणि लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या राजकीय नेते आणि विचारवंताची एक पिढीच आचार्य भागवत, आचार्य जावडेकर, सानेगुरुजी, जयप्रकाश नारायण, डॉ.लोहिया आणि डॉ.आंबेडकर यांच्या रूपाने कार्य झालेली आहे. याची विस्मृतीच आपल्या देशाला पडत चाललेली आहे याचे दुःख होते. असे होण्याचे कारण हिंदुत्ववाद्यांनी या विवेकनिष्ठ राष्ट्रवाद्यांची आणि तो मांडणाऱ्यांची केलेली टिंगल हे एक कारण आहे म्हणून गोळवलकर लोकशाही आणि समाजवादाच्या विरोधी उभे होते,. गोळवलकरांना सामाजिक-आर्थिक न्याय हवा आहे असे ते म्हणतात. परंतु या सामाजिक आर्थिक न्यायाला समतेचे अधिष्ठान त्यांना नको आहे. त्यांची न्यायाची संकल्पना वर्गसापेक्ष आहे कायदेशीर भाषेत बोलायचेच झाले तर चातुर्वर्ण्यातील प्रत्येक वर्गासाठी "स्वतंत्र, परंतु समान" असा न्याय गोळवलकरांना अभिप्रेत आहे या वर्गाधिष्ठीत न्यायाच्या विचाराला अमेरिकन न्यायालयाने "सेपरेट बट इक्वल" असा शब्द वापरलेला आहे. गोळवलकरांच्या समोर अनेक व्यवहारी अडचणी असूनसुद्धा ते चातुर्वर्ण्यव्यवस्थेचा जाहिर आग्रह का धरीत होते याचे उत्तर यामुळे मिळते लोकशाहीचा विचार स्वातंत्र्यावर आणि समाजवादी विचार समतेवर उभा आहे म्हणून गोळवलकर त्या विचारांना प्राणपणाने विरोध करीत होते.

समाजवादी विचार हा एका अर्थाने विवेकनिष्ठ राष्ट्रवादी विचार असल्यामुळे व त्यातील गतिशीलतेमुळे तो राष्ट्राच्या मर्यादा ओलांडून व्यापक अशा वैश्विक जीवनाचा विचार करणारा असल्यामुळे "हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व" अशी राष्ट्रवादाची संकुचित व प्रादेशिक मांडणी करणारे हिंदुत्ववादी समाजवादा विरोधीच राहणार हे अटळ आहे." [६१]

" आपल्या देशाच्या राजकारणात सामान्य हिंदुविरुद्ध हिंदुत्ववादी या संघर्षाचे जे वर्णन प्रा. नरहर कुरुंदकर यांनी त्यांच्या "शिवरात्र" मध्ये केलेले आहे त्याचे काय कारण असावे ? या प्रश्नाचे उत्तर आचार्य भागवत यांनी जावडेकरांच्या " आधुनिक भारताला " लिहिलेल्या प्रस्तावनेत सापडते. हिंदुत्ववादासहित कोणताही " वाद" सामान्य जनतेपासून दूर गेला तर तो तेव्हाच विकृत होतो. सामान्य जनतेच्या जीवनप्रश्नांशी संबंध राखणारा कोणताही वैचारिक पंथ अंती शुध्द झाल्याखेरीज राहात नाही हिंदुत्ववादी आपल्या जातीय मर्यादाबाहेर येत नसल्यामुळे ते सामान्य जनतेपासून दूर गेले आणि पन्नास - पाऊणशे वर्षे राजकारण करूनही त्यांना सामान्य माणसांच्या दारिद्र्याच्या, विषमतेच्या प्रश्नात रस दिसला नाही, म्हणून सामान्य जनतेला हिंदुत्ववादी विकृत वाटले. हिंदुत्ववाद्यांना स्वतःची राष्ट्रवादी भूमिका अद्यापही तपासावीशी वाटत नाही. म्हणून हिंदुत्ववादी विचारी राजकारण शुध्द होण्याची शक्यता ही दृष्टीपथात नाही.

राष्ट्रवाद विकृत झाला असता त्याला फॅसिझमचे स्वरूप येते. या फॅसिझमलाही अध्यात्मवादाचे मोठे आकर्षण असते, ही गोष्ट छोटी नाही. परंतु फॅसिझमची ही विकृती जनताद्रोहामुळे निर्माण होत असते, हे ही आता उघड झालेले आहे. त्यामुळे भारतीय समाज जीवनात लोकशाही समाजवादावर उभा असणारा विवेकनिष्ठ आणि जनताभिमुख राष्ट्रवाद आणि हिंदुत्वादयांचा चातुर्वर्ण्यावर व वर्गवर्चस्वावर उभा असणारा जनताद्रोही व आक्रमक हिंदुराष्ट्रवाद यातील संघर्ष अटळ आहे." [७०]

संघाच्या हिंदुराष्ट्राच्या संकल्पनेवर हल्ला चढवताना भारतीय जन आघाडीतर्फे पुढील भूमिका घेण्यात आली आहे. " हिंदुराष्ट्र हे एखादया उपासनापंथानुसार चालणारं राज्य नसेल राज्य ही एक नागरी संस्था आहे उपासनापंथ व राज्य यांची सरमिसळ भारतीय इतिहासात आढळत नाही असे सांगून हिंदुराष्ट्राचा आदर्श मांडणे फोल आहे. नेपाळने स्वतःला हिंदुराष्ट्र म्हणून घोषित केले आणि स्वतःला विष्णुचा अवतार म्हणवणा-या हिंदूराजाने तेथील जनतेचे लोकशाही स्वातंत्र्य गोठवले." [७१]

" आपणच राष्ट्रवादी आणि लोकशाहीवादी असण्याचा दावा हा भाजप व विश्व हिंदु परिषद यांचा हुकमी एक्का आहे. विहिंप, व रामजन्मभूमीचा प्रश्न हा भारतीय राष्ट्रवाद आणि लोकशाही बळकट करणारा प्रश्न आहे असे वि.हिं.प.सांगते.

पंजाब, काश्मीर, आसाम, अशा राज्यात सुरु असणा-या विघटनवादी चळवळींच्या संदर्भात भाजपचा राष्ट्रीय एकात्मतेसाठी झटणारा राष्ट्रवादी पक्ष असण्याचा दावा अनेक बुध्दीवंतानाही आकर्षून घेतो आहे. त्यामुळे भाजप जमातवादी असल्याचे दाखविणे अपुरे ठरेल आणि भाजपच्या राष्ट्रवादाचीच कसून परीक्षा करावी लागेल,. अडवाणींनी केवळ धर्मराज्य नाकारणे पुरेसे नाही त्यांच्या पक्षाचे महत्वाचे खासदार विश्व हिंदु परिषदेसारख्या कडव्या हिंदु संघटनांच्या पदाधिका-यांत आहेत ही गोष्ट नजरेआड करता येणार नाही. उमा भारतीसारख्या खासदार जाहीरपणे "मुस्लीमांना भारतात रहायचं असेल तर हिंदूच्या दयेवरच जगावं लागेल" असं म्हणतात हे भाजपच्या धर्मनिरपेक्षतेचं द्योतक ठरते का ?."[७२]

"संघाचा राष्ट्रवाद मुस्लीम धर्माच्या लोकांविरुध्द आहे असे सांगताना जनआघाडी पुढीलप्रमाणे विवेचन करते," संघपरिवाराचा मुख्य वैचारिक गाभा केवळ जमातवाद नसून आक्रमक राष्ट्रवाद आहे. "गर्वसे कहो हम हिंदू हैं" ही घोषणा केवळ सांप्रदायिक नाही तर राजकीयही आहे तिचा उद्देश कोणत्याही गोष्टीला न जुमानणारा आहे. ह्या राष्ट्रवादाचा आधार येथील बहुसंख्याच्या धार्मिक श्रध्दांशी संबंधित आहे. कोणत्याही राष्ट्रवादाला आपला शत्रू कोण, हे निश्चित करावे लागते. त्याशिवाय त्याची वाढ होत नाही.

संघपरिवाराच्या हिंदुराष्ट्रवादाने मुस्लीम हा सर्वात मोठा राष्ट्रद्रोही गट असल्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. त्याने मध्यमार्गी व डाव्या पक्षांची संभावना त्या राष्ट्रविरोधी शक्तींचे तारणहार अशी केली आहे. भारतीय राज्यघटनेवरही त्याने मुस्लीमधार्जिणे व हिंदूविरोधी असा शिक्का मारला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तान व बांग्लादेश हे भारताचे सर्वात मोठे शत्रू असल्याची त्यांची भूमिका आहे. संघाच्या या प्रतिक्रियावादी राष्ट्रवादी प्रचारात नवीन असे काहीच नाही. नवीन गोष्ट एवढीच आहे की, त्या जुन्याच प्रचाराला आता वाढता पाठिंबा मिळत आहे. त्या पाठिंब्याची कारणमीमांसा होणे आवश्यक आहे. हा पाठिंबा प्रामुख्याने केवळ शहरातच नव्हे तर मोठ्या छोट्या गावांमधूनही वाढत असणाऱ्या मध्यमवर्गातून मिळतो आहे."[७३]

संघाच्या हिंदुराष्ट्रवादाबद्दलचे आक्षेप अयोध्या प्रश्नानंतर अधिक तीव्र झाले आहेत. त्यातील काहींचा विस्ताराने उल्लेख पुढे केला आहे. त्यात प्रामुख्याने, "धार्मिक स्त्री उवाच " १९९३ च्या अंकातील संदर्भ उल्लेखनीय आहेत. "१९८४ पासून गेली काही वर्षे सातत्याने राममंदिराचा प्रश्न संघपरिवाराने लावून धरला होता. देशापुढे तोच एक राजकीय कार्यक्रम ठेवण्यात १९८९ च्या रथयात्रेपासून त्यांना मोठेच यश मिळाले होते. रामाचा उपयोग हा राजकीय [illegible] हस्तगत करण्यासाठीच होता. त्यासाठी एकजिनसी

" हिंदू अस्मिता " नव्याने निर्माण करण्यापासून ते या देशापुढील सर्व प्रश्नांचे, समस्यांचे कारे व एकमेव मूळ या देशातील "मुसलमान" आहेत हा समज लोकप्रिय व अधिकृत करण्यापर्यंतचे सर्व प्रयत्न संघ परिवाराकडून केले गेले. हिटलरच्या नाझी पक्षाने ज्याप्रमाणे वंशवादाची व राष्ट्रीय समाजवादाची सांगड घालत " ज्यू " विरोधी वातावरण उभे केले व राजकीय सत्ता काबीज केली, तशाच रणनीतीचा पुन:प्रत्यय संघ परिवाराच्या राजकारणातून येत आहे. संघ परिवारानेही विशेषत: भाजपने नवीन आर्थिक धोरणाला व त्यायोगे येणाऱ्या परावलंबीत्वाला विरोध दर्शवून वरवर पाहता राष्ट्रीय समाजवादी वाटेल अशी भूमिका घेतली व जमातवादी राजकारणाशी जोड करुन राजकीय सत्ता बळकावण्याचे प्रयत्न जारी ठेवले. मुसलमानांच्या रुपाने सहज दिसू शकेल असा शत्रूंचा बागुलबुवा निर्माण करण्यात आला आहे. सत्ता काबीज करण्याचे पहिले पाऊल होते - अयोध्या. "मुसलमान" राज्यकर्त्यांनी हिंदुवर मिळविलेल्या विजयाचे हे प्रतीक जे संघपरिवाराला राष्ट्रीय कलंक वाटत होते ते योजनाबध्द तऱ्हेने जमीनदोस्त केले गेले व कमळाआडचे स्वस्तिक अधिकच स्पष्ट झाले."[७४]

" संघ परिवाराकडून जी "हिंदू अस्मिता" नव्याने निर्माण केली गेली आहे तिचाही वेध घ्यायला हवा.

या देशातील विविध धर्म, पंथ, कर्मकांड, उपासना पध्दती याबाबतीत जे वैविध्य आहे ते पूर्णतया नाकारुन "हिंदू" या एखाद्या एकजिनसी, एकसंघ पदार्थ असल्या अशी मांडणी केली जाते. त्याला विरोध व्हायला हवा. संघ परिवार करवेल ते "हिंदुत्व" अशी मांडणी लोकमान्य झाली तर केवळ वेगळे आहेत या कारणावरुन समाजातील विविध गटांना कायम दुय्यम पातळीवर ठेवले जाईल. वैविध्य चिरडून टाकायचा प्रयत्न होईल. त्याप्रमाणे हिंदू धर्मांतर्गत जी एक उतरंडीची जातीबध्द, वर्णबध्द रचना आहे तिच्या विरुध्दचे लढेही चिरडून टाकले जातील. हिंदू हे मुसलमानांपेक्षा, किंबहुना जगातील इतर सर्वच मानवांपेक्षा नैतिक, आध्यात्मिक, वंशादृष्ट्या श्रेष्ठ आहेत या मांडणीमध्ये हाच डाव आहे. याच हिंदू धर्मांतर्गत स्त्रियांच, दलित यांचे काय स्थान आहे. हा प्रश्न सातत्याने उभा केला पाहिजे."[७५]

हिंदूच्या भावना भडकवण्यासाठी पुढीलप्रमाणे आवाहन केले जात आहे; "हिंदूची एकमेव मातृभूमी नष्ट करण्याचा हिंदूचे अस्तित्वच पुसून टाकण्याचा त्यांचा कट आहे हिंदूवरचे हे अत्याचार ते शतकानुशतके करतच आले आहेत. त्यांच्या ताकदीला ताबडतोब आवर घातला नाही तर हिंदूचा धर्म, त्यांची पवित्र स्थळे, त्यांचे जीवित, त्यांची संपत्ती, त्यांच्या स्त्रियांचे पावित्र्य धोक्यात येईल, नष्ट होईल; स्वतःच्याच भूमीत पुन्हा एकदा गुलाम बनून जगण्याची पाळी हिंदूंवर येईल. आजच त्यांच्यावर निर्वासितांचे लाजिरवाणे जिणे कंठण्याची पाळी मुसलमानांनी आणली आहे." संबंध मुसलमान समाजाचे असे विकृत चित्र साध्वी ऋतंभरा [आणि त्यांच्यासारखे इतर वक्ते] उभे करतात."[७६]

" साध्वी ऋतंभरांबिद्दल विवेचन करताना एक मुद्दा सतत लक्षात ठेवला पाहिजे. साध्वी प्रभावी वक्त्या ठरल्या. गर्दीला भुरळ पाडू शकल्या, कृतीसाठी पेटवू शकल्या, परंतु हे सगळे त्यांनी एका लाटेवर आरूढ होऊन केले ती लाट त्यांनी निर्माण केली नव्हती. ती लाट पद्धतशीर व योजनाबद्ध रीतीने उत्पन्न केली गेली होती. समस्त संघ परिवाराने प्रचार, प्रतीकात्मक कृती (उदा.रामशिलान्यास) इत्यादी मार्गांनी पूर्वतयारी केली होती. वातावरणाला लाटेचे स्वरूप दिले. श्री.लालकृष्ण अडवाणींच्या रथयात्रेने साध्वी ऋतंभरांनी त्या लाटेला भागभूमीत आक्रमक धार दिली ती लाटच नसती तर त्यांचे वक्तृत्व उद्दीपक व प्रभावी न ठरता निव्वळ आक्रस्ताळे बरळणे ठरले असते."[७७]

" साध्वी ऋतंभरांना वापरण्यासाठी मिळाले ते एक तयार, मान्यता पावलेले प्रतीक " श्री राम " हे प्रतीक नवीन घडविलेल्या "हिंदु" अस्मितेचे सम्यक प्रतिनिधित्व करीत होते. किंबहुना या प्रतिकाची निर्मिती व या अस्मितेची घडण यात एकवाक्यता व एकात्मता होती पुन्हा हे प्रतिक निव्वळ उदात्ततेचे साधन नव्हते. त्याच्याशी निश्चित, प्रत्यक्ष, सगुण - साकार, आक्रमक वृत्ती निगडीत होती. बाबरी मशिदीचा विनाश आणि राममंदिराचे निर्माण" या एक कलमी कार्यक्रमाची हाक साध्वी ऋतंभरा देत होत्या. एक कलमी, एकघाती कार्यक्रमांना विचारी, दृढ निश्चयी, प्रदीर्घ सामाजिक राजकीय संघर्षांची तयारी असलेल्या संघटीत समुदायांची, जनसंघटनांची गरज नसते.

झपाटलेला, त्या क्षणापुरता उद्दीपित झालेला समूह आणि एखादे कृत निश्चयी, अतिरेकी, धाडक दल इतक्याच आधारावर एक कलमी कार्यक्रम पार पाडता येतो. धाडक दलाचे संघटन संघ परिवारातील सुसज्ज संघटनांनी केले असावे. समुदायांना उद्दीपित करण्याचे कार्य साध्वी ऋतंभरांसारख्या मैदानी वक्त्यांनी केले हे काम कमी लेखता कामा नये. ६ डिसेंबर १९९२ ला अयोध्येत प्रचंड, उत्तेजित, झपाटलेली गर्दी जमणे आवश्यक होते. ती नसती तर धाडक दलातले "योध्दे" मूठभर अतिरेक्यांप्रमाणे वेगळे असते. जनमान्यतेचे जे संरक्षक कवच प्राप्त झाले ते झाले नसते."[७८]

मंदीर मशीद वादाबद्दल प्रा.स.ह.देशपांडे यांचे पुढील आक्षेप विचारात घेण्याजोगे आहेत, " रामकथा ऐतिहासिक समजली तरी रामाची लोकमानसातील प्रतिमा निखळपणे ऐहिक नाही जशी चंद्रगुप्त, चाणाक्य, कालिदास, पाणिनी, वराहमिहिर किंवा आर्यभट्ट ह्यांची आहे. राम देवतास्वरूप आहे, त्यांची मंदिरे असतात. रामजन्मभूमीचा वाद हा एक मंदिर पाडून मशीद बांधली गेली ह्या श्रध्देतून निर्माण झालेला वाद आहे. अर्थात राम हे सांस्कृतिक प्रतीक आहे पण ते शंभर टक्के सांस्कृतिक नाही. ते अर्ध धार्मिक, अर्ध सांस्कृतिक प्रतीक म्हणावे लागेल. रामाकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन असतात आणि त्यातला एक धार्मिक आहे हे अडवाणींनाही मान्य आहे."[७९]

" मंदीर उभारणीसाठी दुसरे एक समर्थन देण्यात येते ते असे की बाबर ह्या परकीय आक्रमकाने मंदिराचा विध्वंस करुन मशीद बांधलेली असल्याने ह्या आक्रमणाची खूण नाहीशी केली पाहिजे. भारतीय नागरीक स्वतःला कोणाशी जोडू इच्छितो, राष्ट्रवीर रामाशी की बाबर बादशहाशी ? असे जेव्हा अडवाणी विचारतात तेव्हा त्यांच्या मनात हाच युक्तिवाद असतो."८०

" ह्याचा अर्थ असा होतो की, भारतीय वंशाच्या [धर्मांतरित] मुसलमानांनी मंदिरे पाडली असती तर त्यांच्या पुनरुद्धाराची मागणी वि.हि.पं. आणि भा.ज.प. ह्यांनी केली नसती हे खरे आहे काय ? नाही असे वाटते. हिंदूवर विविध प्रकारचे अन्याय आणि अत्याचार करण्यात परकीय आणि भारतीय मुसलमान ही विभागणी ह्या संदर्भात निरुपयोगी आहे शिवाय संघ परिवाराने मंदिर आंदोलनापर्यंत तरी अशी विभागणी केल्याचे उदाहरण नाही. मुसलमान राष्ट्रीय अर्थाने हिंदू असू शकतो असे म्हणत असताना संघपरिवाराच्या मनात केवळ धर्मांतरितच मुसलमान असतो असे दाखविता येणार नाही.

" परकीय " म्हटले की आणखी काही अवघड प्रश्न उभे राहतात. बाबर परकीय हे बरोबर आहे पण त्याचे वंशज अखेरपर्यंत परकीयच राहतात काय ? तसे राहत नसले तर औरंगजेबाने केलेले मंदिराचे विध्वंस धडा मानावे लागतील.

ज्यांच्या आया हिंदू [रजपूत] होत्या ते मुसलमान सुलतान परकीय कसे असाही प्रश्न विचारता येईल..

तेव्हा परकीय आक्रमणाच्या प्रतिकात्मक निषेधा हे स्वरूप मंदिर आंदोलनाला देता येणार नाही." [८२]

"मंदीर आंदोलनाचा खरा अर्थ पुढीलप्रमाणे दिसतो मग जो उघडपणे सांगितला जावो वा न जावो. वाढत्या मुस्लिम आक्रमकतेला व ती पोसणाऱ्या व्याज - धर्मनिरपेक्षतेला प्रत्युत्तर म्हणून हिंदूच्या संघटित शक्तीचे प्रदर्शन करून एक जरब निर्माण करणे आणि अनुषंगाने अधिक निवडणुका जिंकून व कायदेमंडळाकडून हिंदुत्ववादी प्रतिनिधींची संख्या वाढवून हिंदूचा राजकीय दबाव वाढविणे. आंदोलन यशस्वी झाले तर आणखी एक लाभ होईल, हिंदू समाजाला काहीतरी प्राप्तव्य गाठल्याच्या भावनेतून एक आत्मविश्वास आणि मानसिक उभारी मिळेल." [८२]

" हा हिंदू संघटित करताना त्याला उद्दीपित करणारे प्रतिक जर धार्मिक असेल तर अधिक उपयोगी पडते हे संघपरिवाराला ठाऊक होते.

म्हणून अगोदरच कित्येक वर्षे लहान प्रमाणावर चालू असलेल्या ह्या आंदोलनाला त्याने राष्ट्रीय पातळीवर आणून ठेवले. समान नागरी कायद्यासारख्या विषयांवर हिंदूंना संघटित करणे कठीण असल्यामुळे अयोध्येचा राम हे प्रतीक निवडण्यात आले असे भा.ज.प. च्या एका नेत्याने पुण्याच्या सभेत सांगितले होतेच. मुस्लिम आक्रमकतेला प्रत्युत्तर हा प्रस्तुत आंदोलनाचा उद्देश आहे हे आणखी एका पुराव्याने स्पष्ट होते. देवळे पाडून काही ख्रिस्ती प्रार्थना मंदिरेही उभारण्यात आली आहेत पण मंदिर - आंदोलनात त्यांचा अंतर्भाव होत नाही. ह्याचे कारण ख्रिस्ती लोक आज मुसलमानांइतके आक्रमक नाहीत.

मंदिर आंदोलनाचा खरा अर्थ हा असा आहे. आणि त्या दृष्टीनेच त्याचे मूल्यमापन केले पाहिजे.

आणि असे मूल्यमापन करताना ध्यानात येते की हा उपक्रम संघाच्याच तात्त्विक भूमिकेशी व्यापक हिंदुराष्ट्रवादाशी विसंगत आहे.

संघपरिवाराची धर्मनिरपेक्ष हिंदुत्वावर खरीखुरी श्रद्धा असेल तर त्याने धार्मिक प्रतीके वापरू नयेत एवढाच टीकेचा मुद्दा आहे." [८३]

संघाच्या सामाजिक समरसतेसाठीच्या प्रयत्नाबाबतची संघाच्या टिकाकारांच्या मनात असणारी साशंकता पुढील मजकुरातून स्पष्ट होते. " डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांच्या हिंदुधर्म, जातीव्यवस्था, अस्पृश्यता धर्मांतर इत्यादीबाबतच्या विचाराचे हिंदुकरण करण्याचा "शिस्त" बध्द प्रयत्न उजव्या मूलतत्ववादी, प्रतिगामी, जातीयवादी संघटनांनी चालविला आहे. त्यांना हिंदू बनविण्यासाठी टाकलेला पहिला डाव म्हणजे रा.स्वं.संघाच्या "प्रातःस्मरणात" [एकात्मता स्तोत्र] डॉ. आंबेडकरांच्या नावाचा केलेला समावेश."[८४]

" हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या या संघटना एक ताल, एक सुरात डॉ.आंबेडकरांचे विचार हिंदू धर्म, हिंदू समाज. अखंड हिंदुस्थानला पोषक असल्याचा दावा करतात. हा दावा सामाजिक समरसता मंचच्या व्यासपीठावरुन केला जातो. हिंदुत्ववादी विचारावर पोसलेल्या स्वयंसेवकांनी ब्राह्मण्यवादाचा विविध क्षेत्रात प्रसार केला. याच संघटनांचे पहिल्या व दुसऱ्या फळीतील बहुसंख्य नेते व कार्यकर्ते ब्राह्मणच आहेत. रा.स्व.संघासकट सर्व संघीय संस्थेतील प्रवेश इतरांनी हिंदु समाज व हिंदुस्थानशी जुळवून घेण्यावरच अवलंबून असतो.

हिंदू जीवनपध्दती अंगिकारणे आवश्यक अट आहे, ही जीवनपध्दती मुख्यत: ब्राह्मणांचीच जीवनपध्दती होय. व्रतवैकल्य, सत्यनारायण पूजा, लक्ष्मीपूजन, गौरी गणपती पूजा, हळदीकुंकू, दिवाळी दसरा सण ब्राह्मणी पध्दतीनेच पार पाडले जातात. सण उत्सव व आचारांच्या बरोबरच विचारांचेही ब्राह्मणीकरण झाले. परंतु हा संकुचितपणा झाकण्यासाठी हिंदुत्वाची ढाल पुढे केली जाते. " हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व " ही घोषणा बनते. या राष्ट्रीयत्वाचा विस्तार ब्राह्मणीसत्तेपुरता सीमीत असतो. सर्व हिंदूंचे संघटन झाले तर नेतृत्वाची सूत्रे ब्राह्मणांकडेच राहतील अशी मुत्सध्दी तरतूद केली जाते. ब्राह्मणी सत्तेच्या सिंहासनाला सुरुंग लावणाऱ्या व्यक्ती व संघटनांचेही ब्राह्मणीकरण केले जाते.".[८५]

" डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जन्मशताब्दी समारंभ सर्वत्र सुरु असतानाच त्यांचे हिंदूकरण करण्याचे डावपेच आखण्यात येत आहेत. त्या मागचा संदर्भही खूपच महत्वाचा आहे. आंबेडकरवाद्यांनी शिक्षण, संस्कृती, साहित्य क्षेत्रात नवे मानदंड स्थापन केले त्यांनी दलितांच्या शोषणाचे शत्रू शोधले त्यांनी शोषण व्यवस्थेविरुध्द संघर्ष उभा केला. त्यांचा राजकारणातील दबाव वाढू लागला. " गर्वसे कहो हम हिन्दू है " या घोषणेला " गर्वसे कहो हम भारतीय हैं " या भीमटोल्याने प्रत्युत्तर दिले मुस्लिम मतपेटीप्रमाणेच दलित-मागासवर्गीयांच्या मतपेटीला सत्तास्पर्धेत महत्व प्राप्त झाले.

विधानसभा [१९९०] व लोकसभा [१९९१] निवडणुकीत दलित मतपेटीने काँग्रेसला दिल्लीची सत्ता मिळवून दिली. ही मते आपल्या बाजूने वळवल्याशिवाय " हिंदु - राष्ट्र" चे स्वप्न साकार होणे कठीण असल्याचे स्पष्ट झाल्यावर हिंदुत्ववाद्यांनी दलित मागासवर्गियांना आपल्या गटात ओढण्याचे जोरदार अभियान सुरु केले."[८६]

" आपल्या कार्यक्रमांत दलित विचारवंत, साहित्यिक नेते इत्यादींना प्रमुख पाहुणे, उद्घाटक, अध्यक्ष म्हणून निमंत्रित करणे, डॉ.आंबेडकरांना मान वंदना देण्यासाठी रा.स्व.संघाचे भव्य पथसंचलन, सहकारी शेतीचा प्रयोग, वनवासी कल्याण आश्रमांची स्थापना, दलित नेत्यांच्या हिंदुत्ववादी कार्यक्रमातील सहभागाला विशेष सचित्र प्रसिद्धी इत्यादी विविध मार्गाने दलित अनुयायी व नेत्यांना हिंदुत्ववाद्यांच्या कळपात ओढले जाते. याच मार्गांनी हिंदुत्वादी मंडळी आंबेडकरी चळवळीत शिरकाव करीत आहेत. हिंदुत्ववादी म.फुले आंबेडकरांचे नाव घेऊन आपली जातीयवादी प्रतिमा स्वच्छ करण्याचा प्रयत्न करीतायेत. त्या ते काही "उपक्रम" राबवितात. त्यांच्या जाळ्यात काही दलित विचारवंत, साहित्यिक, वकील,प्राध्यापक, नगरसेवक अडकलेत."[८७]

" आणीबाणीच्या काळात संघ बदलत असल्याचे प्रमाणपत्र जयप्रकाश नारायण, मोरारजी देसाई, जगजीवनराम, अच्युतराव पटवर्धन एस.एम.जोशी यांनी दिले होते. परंतु सरसंघचालक बाळासाहेब देवरसांनी ठासावले की, संघ बदलला नाही. संघाकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन बदलत आहे."[८८]

" संघाच्या आर्थिक राष्ट्रवादावर टीका करताना जन आघाडी म्हणते, " आंतरराष्ट्रीय नाणे निधीने भारताची नवी आर्थिक नीती निश्चित करुन भारतीय अर्थव्यवस्था परकीय भांडवलाला खुली केल्यामुळे संघ परिवारातल्या एका गटाने स्वदेशीची घोषणा करुन आर्थिक राष्ट्रवादाची मांडणी सुरु केली आहे. परकीय स्पर्धेची भीती वाटणारे अनेक छोटे मोठे भांडवलदार आकर्षून घेण्याचा त्या घोषणेचा हेतू आहे."[८९]

" महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास " या पुस्तकात नलिनी पंडित संघाच्या एकूण सर्वच भूमिकेवर टीका करताना स्पष्ट करतात, "व्यक्तिस्वातंत्र्य, बुध्दिनिष्ठ, सहिष्णुता इत्यादी लोकशाहीच्या मूलतत्वाऐवजी बलसंवर्धन, विभूतीपूजा, शिस्तपालन इत्यादी मूल्यांचा संघाने उदोउदो केला. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी धडपड करण्याऐवजी शिस्तीच्या व सुव्यवस्थेच्या नावाखाली त्याला एक ठराविक साच्यात कोंडण्याची त्याने महत्वाकांक्षा बाळगली. परंतु दलितांचे संख्याबल, शरीरसामर्थ्य आणि त्यांच्यातील विचारजागृती, यांना घाबरणा-या उच्चवर्णीयांना, बहुजनसमाजाची चळवळ दडपून टाकण्यासाठी तिचा आधार घ्यावासा वाटला. म्हणून ते मोठया संख्येने संघामध्ये सामील झाले. आपले डळमळणारे आसन कसे बसे टिकविण्यासाठी, धडपडणा-या संस्थानिक सरंजामदारांसारख्या

जुन्या वर्गांना मध्ययुगीन मूल्यांची जोपासना करणारी ही विचारसरणी विलोभनीय वाटली म्हणून त्यांनीही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला सहानुभूती दाखविली." [१०]

" परंपरानिष्ठ आक्रमक राष्ट्रवाद हा जनसंघाच्या विचारप्रणालीचा गाभा आहे संघाचा राष्ट्रवाद भावनाधिष्ठेत स्वयंकेंद्रीत राष्ट्रवाद असल्याने त्याला राष्ट्रवादाचे सोज्वळ स्वरूप प्राप्त होते." [११]

भाजपच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाबद्दल बोलताना डॉ.अरुणा टिकेकर म्हणतात, " भाजप प्रणित राष्ट्रवाद हा धर्माच्या पुनरुज्जीवनाचे स्वप्न उराशी बाळगणारा आहे. सुरक्षा, शुचिता, स्वदेशी, समरसता या चतुःसूत्रीभोवती भाजपाची हिंदुत्वाची ही व्यापक संकल्पना फिरते हिंदुत्व म्हणजे सांस्कृतिक राष्ट्रवाद असा भाजपचा दावा आहे. धार्मिक राष्ट्रवादाला हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाची झूल देतानाही आपला पक्ष, एक राष्ट्र, एक जनता, एक संस्कृती " या तत्वांवर श्रध्दा ठेवून आहे. असे जाहीरनामा म्हणतो. खरा अंतर्विरोध हेच आहे. बहुधर्मीय बहुभाषिक, राष्ट्रात अशी सांस्कृतिक एकसंधता कितपत राखता येईल या विचारानेच स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाहीच्या पुरस्कार करणाऱ्या नेत्यांनी निधर्मवादाला जवळ केले.

बहुधर्मीयांच्या राष्ट्रात एकसंधता साधावयाची असेल तर राजकारणापासून धर्म अलग ठेवणे क्रमप्राप्त आहे. असाच विचार तत्कालीन समाजधुरीणांनी केला होता. भाजपचा धार्मिक राष्ट्रवाद उर्फ सांस्कृतिक राष्ट्रवाद एक राष्ट्र, एक जनता एक संस्कृतीचा नारा देत हिंदूधर्माच्या पुनरुज्जीवनाची भाषा करत आहे. भाजपच्या जाहिरनाम्यातील आश्वासनाचे स्वरुप संपूर्णपणे राजकीय आहे." [९२]

संघाची भूमिका समन्वयवादी असली तरी संघाच्या " भारतीय मजदूर संघ " व " भारतीय किसान संघ " यांची भूमिका कशी परस्परविरोधी आहे स्पष्ट करताना गंगाधर इंदूरकर म्हणतात, " आता श्री.दत्तोपंत ठेंगडी भारतीय किसान संघाचे काम करीत आहेत. कारखान्यात काम करणारे मजूर आणि स्वत: जमीन कसून अन्न पिकविणारा शेतकरी याचे हितसंबंध परस्परविरोधी आहेत. कारखान्यात काम करणाऱ्या मजूराला त्याच्या दैनिक गरजांचा पुरवठा कमी किंमतीत व्हायला हवा असतो आणि शेतकऱ्याला तर त्याच्या मालाची अधिक किंमत हवी असते. कारण त्यालाही होणाऱ्या महागाईची झळ लागत असते. कारखान्यात काम करणारा व शेतीवर रोजंदारीने काम करणारा मजूर याचे हितसंबंध काही प्रमाणात एक होऊ शकतात, पण ज्याची स्वत:ची जमीन आहे

तो कितीही लहान शेतकरी असला तरी त्याचे आणि कारखान्यात काम करणाऱ्या मजूराचे हितसंबंध एका पातळीवर येऊ शकत नाहीत. परिणामी एकाच संस्थेतून निर्माण झालेल्या संघटनात संघर्ष निर्माण होणार. मजूर आणि मालकांत समन्वय साधण्याचे काम जेथील चालकत्व, संघाशी संबंधित अशा लोकांच्या हाती आहे तेथीही झाले नाही, असे का व्हावे हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे."[९३]

संघाच्या कामावरील धर्माच्या प्रकट प्रभावाबद्दल आपला परखड दृष्टीकोन स्पष्ट करताना इंदूरकर म्हणतात, "धर्माचार्यांची पकड सामाजिक मनावर असते, म्हणून यांचा वापर सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी करायला हवा असा विचार विश्व हिंदू परिषदेचे काही कार्यकर्ते मांडतात. वैचारिकदृष्ट्या या विचारसरणीत काही दोष नाही. समाजमानसावर धार्मिक वृत्तीची पकड बसली आहे असेही आपणाला आढळून येते पण यांत विचार करण्यासारखा भाग आहे तो हा की, सामाजिक परिवर्तनासाठी धर्माचार्यांचा वापर, आपण योजनापूर्वक करावयाचा की त्यांची सत्ता टिकविण्यासाठी त्यांना आपण आपला वापर करू द्यावयाचा? आतापर्यंतचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आणि त्यातून निघालेल्या संस्थांचा इतिहास असा आहे की, छोटी मोठी कामे वगळली तर कुठल्याही कार्यात संघाला यशाचे शिखर गाठता आलेले नाही.

उलट निरनिराळ्या प्रकारे संघ आणि संघ संस्थांचाच वापर हितसंबंध जोपासण्यासाठी इतरांनी करून घेतला आहे. संघ कार्यकर्ते मात्र या भ्रमातच राहिले की आम्ही आमचा वापर कुणालाही करू देत नाही. पण हा निराळा चर्चेचा विषय आहे. विश्वहिंदुपरिषदेने उचललेल्या कामाच्या संदर्भात,दुसरा महत्वाचा विचार असा की, धार्मिक भावना बळावल्याचे जे दृश्य दिसते त्याचे खरे स्वरूप काय आहे ? भारताच्या ज्या अध्यात्मिक प्रवृत्तीचा ठसा जगावर कायमचा उमटला ती वाढते आहे का ? संकष्टी चतुर्थीस गणपती मंदिरात, मंगळवारी देवीच्या मंदिरात अगर शनिवारी मारुतीला भाविकगणांची जी गर्दी आढळते त्यामागचे खरे कारण काय ? ही खरी भक्ती आहे की, सर्वसामान्य माणसांत जो एक मानसिक दुबळेपणा असतो त्याचे ते सूचक आहे ? गोर गरिबांना सर्व प्रकारे नागविणारा सावकार त्याच पैशातून एक मंदिर बांधतो आणि धर्मात्मा ठरतो. लहान प्रमाणावर तसलाच तर हा प्रकार नाही ना ? खोटे नाटे केल्याशिवाय जीवनच जगता येत नाही अशी आज परिस्थिती निर्माण झाली आहे. त्या खोट्यानाट्या गोष्टींविषयी माणसाचे मन कुठेतरी त्याला खात असते. म्हणून आधार शोधण्यासाठी तो या मंदिरातून जातो. ही धार्मिक वृत्ती नाही जे अशा वृत्तीचे नेतृत्व करतात त्यांच्या बळावर समाजपरिवर्तनाची क्रियाही घडू शकणार नाही." [१४]

स्वातंत्र्यचळवळीत संघाचे योगदान नसण्याचेही इंदूरकरांनी ध्यानात आणून दिले आहे; "संपूर्ण देशाला स्वतंत्र करण्याच्या हेतूने जी संघटना स्थापन झाली, देश चारोबाजूंनी स्वतंत्र होत असताना त्याची जाणीव त्या संघटनेला झाली नाही. इंग्रजांनी देशाच्या फाळणीचे जे कारस्थान रचले त्याला आळा घालण्यास रोखून उभे राहण्याचे धाडस संघ नेतृत्वाला झाले नाही. नंतर फक्त अस्तित्व टिकवण्याच्या मागे संघ लागला. निरनिराळ्या संस्थाही कायम झाल्या पण त्यासाठी आवश्यक असे नवे तंत्र निर्माण झाले नाही. सार्वजनिक संस्थांच्या संदर्भात जी तंत्रे होती ती त्यांच्या गुणदोषांसकट स्वीकारण्यात आली."[९५]

पाश्चात्य व भारतीय संस्कृतीबद्दल संघाच्या भूमिकेचे स.ह.देशपांडे यांनी पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे, "पाश्चात्य संस्कृती भोगवादी आणि आमची अध्यात्मवादी हे विधान केवळ हिंदुत्ववाद्यांनाच प्रिय आहे असे नव्हे. मात्र हिंदुत्व वाद्यांना ते विशेषकरून प्रिय आहे. ह्यात शंका नाही. केवळ भौतिकवाद अपुरा असे त्यांचे मत आहे. भारतीय संस्कृतीचा वा अर्थव्यवस्थेचा पाया गरजेनुसार उत्पादन व स्वावलंबन हा आहे. व समाजातील लोकांच्या गरजा कमीत कमी असाव्या व त्यांच्या पूर्तीवर सर्वांचा भर असावा यावर आहे. संपत्तीचा व सुखसाधनांचा गरजेपुरता उपभोग हे भारतीय संस्कृतीला अपेक्षित आहे.

पाश्चात्य अर्थसंस्कृती व भारतीय अर्थसंस्कृती यांत हा महत्वाचा भेद आहे. पाश्चात्य अर्थसंस्कृतीतून स्पर्धा, इर्षा, असमाधान यांची वाढ होते तर भारतीय अर्थसंस्कृती ही समाजातील सर्व घटकांत समानता निर्माण करणारी, संयमशीलता वाढविणारी व समाधानी जीवनाकडे नेणारी आहे. वेदांतर्गत विचारांच्या पायावर अर्थसंस्कृती उभारल्याशिवाय समाजाला स्थैर्य व राष्ट्राला बळकटी येणार नाही असे स्वामी विवेकानंदांनी प्रतिपादन केले आहे." [९६]

संघाच्या एकूणच टीकाकारांबाबत आपले स्पष्टीकरण देताना मो.गो.तपस्वी म्हणतात, "आधीच्या प्रकरणात येऊन गेलेल्या बाबी लक्षात न घेता टीकाकार संघावर टीका करीत असतात. या टीकाकारांचे दोन वर्ग आहेत. एक अशा लोकांचा, ज्यांना संघाने हे हे असे असे न करता ते ते तसे करावे असे मनापासून वाटत असते. दुसरा वर्ग, संघाबाबत द्वेष बाळगून पण संघ नेमका काय आहे ? याची सुतराम दखल न घेता टीकाच करीत राहणाऱ्यांचा आहे. पहिल्या वर्गातील टीकाकार नेहमी म्हणत असत की, संघ काय करतो आहे ? संघटनेकरिता संघटना म्हणजे तरुणांची शक्ती कुंठून एकाच ठिकाणी डांबून ठेवण्यासारखे आहे. संघाने हे करावे, ते करावे नुसती संघटना करीत बसू नये. म्हणजे संघकार्य हे चांगले कार्य आहे हे या वर्गाला पटते, परंतु त्या चांगल्या कार्याचा उपयोग चांगल्याप्रकारे होत नाही अशी या वर्गाची खंत असते.

संघ नेमका काय आहे हे या वर्गाला समजावून सांगण्याची गरज आहे. टीकाकारांच्या दुसऱ्या वर्गात दोन पोटवर्ग आहेत. एकाला संघ ही धार्मिक उन्माद वाढविणारी सैनिक संघटना आहे म्हणून तिला धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्थेत कोणतेही स्थान असता कामा नये असे वाटत असते. दुसऱ्या पोटवर्गाला संघाची विचारसरणी देशभर पसरल्यास आपण आजवर प्रचारित आणि प्रसारित करीत आलेल्या साऱ्या मान्यतामान्यता कोसळतील अशी धास्ती वाटल्यामुळे तो संघावर वाटेल ती टीका करीत असतो. पहिल्या पोटवर्गाला सैनिक संघटना आणि धर्मनिरपेक्ष व्यवस्था म्हणजे नेमके काय ? हेच माहित नसते आणि म्हणून या दोन्ही संकल्पनांची भयानक गल्लत व गोंधळ मनात असतो. दुसऱ्या पोटवर्गाला फक्त तात्त्विकदृष्ट्या विचार करता संघ थोडा बरोबर समजलेला असतो. परंतु तो समज नकारात्मक असतो. या दोन्ही पोटवर्गातील टीकाकारांनी पुस्तकी संकल्पनांची गल्लत न करता संघाकडे पहायला शिकायला हवे आणि भारतीय जनजीवनाचा पोषक आणि "स्व" म्हणून या राष्ट्राचे जे काही आहे ते जतन करणारा संघ सकारात्मकदृष्ट्या समजावून घ्यायला हवे आहे."[२७]

संघ विचारात राष्ट्र, राष्ट्रवाद, राष्ट्रबांधणी या संबंधीचे विचार, ह्या संबंधातील संघाच्या टीकाकारांचे आक्षेप व त्यात संघाची भूमिका यांचा परामर्श घेऊन झाल्यावर संघाच्या ह्या विचारांच्या प्रचलित संदर्भात सुसंबद्धतेबद्दल माझे निष्कर्ष पुढील प्रकरणात नोंदवले आहेत.

## प्रकरण तिसरे

### संदर्भ


१) मो.ग.तपस्वी, " युग प्रवर्तक संत", पृ. ८

२) ब.ना.जोग ; " राष्ट्रकारणासाठी राजकारण " ,
" पं.दीनदयाळ उपाध्याय : विचारदर्शन " [ खंड २],
मध्ये समाविष्ट पृ. २३८

३) मा. गो. वैद्य, " राष्ट्र, राज्य, आणि शासन ", पृ.१८०

४) भानुप्रताप शुक्ल ; " राष्ट्र " पृ.२२६

५) किता, पृ.२६६

६) पंडित दीनदयाळ उपाध्याय , " एकात्म मानववाद ", पृ.३६

७) किता पृ.३८

८) किता पृ. ४३ - ४४

९) किता पृ. ४५

१०) मा. गो. वैद्य ; उपरोक्त, पृ. १७८ - १७९

११) मा. गो. वैद्य ; उपरोक्त, पृ. १७९

१२) वि.ना.नेने ; " एकात्म मानव दर्शन " , " पं.दीनदयाळ उपाध्याय :
विचारदर्शन " [ खंड १ ] , मध्ये समाविष्ट पृ. ३०० - ३०१

१३) किल्ला, पृ. ३०१

१४) मो.ग.तपस्वी ; उपरोक्त, पृ. ५३ – ५४

१५) मो.ग.तपस्वी ; उपरोक्त, पृ. ५४

१६) मो.ग.तपस्वी ; उपरोक्त, पृ. ५४

१७) अँडरसन वॉल्टर के आणि दामले ; "ब्रदर हुड इन सॅफ्रन"
पृ. १७३ – १७४.

१८) रमेश पतंगे ; "समाजचिंतन" पृ. ४५ – ४६

१९) प्रा. स. ह. देशपांडे ; "सावरकर ते भाजप हिंदुत्वविचारांचा चिकित्सक आलेख", पृ. १५०

२०) किल्ला, पृ. १५०

२१) रामशंकर अग्निहोत्री आणि भानुप्रताप शुक्ल ; "राष्ट्रजीवन की दिशा" पृ. १७१ – १७८

२२) भानुप्रताप शुक्ल, उपरोक्त पृ. २६३

२३) भानुप्रताप शुक्ल, उपरोक्त पृ. २६३

२४) जयप्रसाद के ; "आरएसएस. अँन्ड हिंदू नॅशनॅलिझम"

२५) दीनानाथ मिश्रा ; "आरएसएस : मिथ अँन्ड रिॲलिटी"
पृ. ९० – ९२

२६] किल्ला • पृ• ९० - ९२

२७] रामशंकर अग्निहोत्री आणि भानुप्रताप शुक्ल ; उपरोक्त, पृ.५८

२८] रामशंकर अग्निहोत्री आणि भानुप्रताप शुक्ल ; उपरोक्त, पृ.६०-६१

२९] पां.कृ.सावळापूरकर ; " दैशिकशास्त्र " पृ. २०

३०] रामशंकर अग्निहोत्री आणि भानुप्रताप शुक्ल ; उपरोक्त पृ.७६-७७

३१] रामशंकर अग्निहोत्री आणि भानुप्रताप शुक्ल ; उपरोक्त पृ.७७

३२] रामशंकर अग्निहोत्री आणि भानुप्रताप शुक्ल ; उपरोक्त पृ.२०७

३३] रमेश पतंगे ; उपरोक्त

३४] रमेश पतंगे ; उपरोक्त

३५] रमेश पतंगे ; उपरोक्त पृ. ८०

३६] पं.प.भिशीकर ; " केशव : संघ निर्माता " पृ. १६१

३७] पं.दीनदयाळ उपाध्याय ; उपरोक्त पृ.७६

३८] वि.ना.नेने ; उपरोक्त , पृ.१७० - १७१

३९] वि.ना.नेने ; उपरोक्त , पृ.१७० - १७१

४०] वि.ना.नेने ; उपरोक्त , पृ.२०४

४१] भा.कृ.केळकर, " दीनदयाळजींचा राजकीय वारसा ", "पं.दीनदयाळ उपाध्याय : विचारदर्शन " [खंड १ ] मध्ये समाविष्ट पृ.३१२

४२] डॉ.अरविंद गोडबोले ; " सावरकर विचारदर्शन " पृ.५२

४३] प्रा. स. ह. देशपांडे ; उपरोक्त, पृ. १५९ - १६२

४४] रमेश पतंगे , उपरोक्त

४५] रमेश पतंगे , उपरोक्त

४६] बाळासाहेब देवरस [ पुरस्कार] , उपरोक्त पृ.९

४७] परिवर्तन विशेषांक

४८] प्रा.स.ह.देशपांडे "सावरकर ते भाजप - हिंदुत्वविचारांचा चिकित्सक आलेख" पृ.१५७

४९] किता पृ. १५७ - १५८

५०] किता, पृ. १५८

५१] किता, पृ. १५९

५२] प्रा. स.ह.देशपांडे ; किता १५९ - १६०

५३] प्रा.स.ह.देशपांडे ; किता १६०

५४] प्रा.स.ह.देशपांडे ; किता १६०

५५] प्रा.स.ह.देशपांडे ; किता १६० - १६१

५६] मा.गो.वैद्य ; उपरोक्त, पृ. २४

५७] मा.गो.वैद्य ; उपरोक्त पृ. २४ - २५

५८] प्रा.स.ह.देशपांडे ; उपरोक्त , पृ. १६१-१६२

५९] प्रा.स.ह.देशपांडे , उपरोक्त पृ. १६२

६०] गंगाधर इंदूरकर , " राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : काल,आज आणि उदया " पृ.११० - १११

६१] तित्ता पृ. १११ - ११२

६२] जयप्रकाश नारायण , "नेशन बिल्डिंग इन इंडिया " पृ.४१३

६३] तित्ता पृ.४१८

६४] तित्ता पृ. ४१४

६५] तित्ता पृ. १३२

६६] तित्ता पृ. १३३

६७] ब्रह्मानंद [ फोरवर्ड] , "नेशन बिल्डिंग इन इंडिया "

६८] डॉ. रावसाहेब कसबे , " झोत " पृ. ७०

६९] तित्ता पृ. ७५ - ७६

७०] तित्ता पृ. ७७ - ७८

७१] " भारतीय जनवादी आघाडी , " इंडिया " स सैफ्रन सर्ज : रेनॉयसन्स और फॅसिझम ? पृ. ९२

७२] तित्ता , पृ. ९२

७३] तित्ता , पृ. २६५

७४] जयश्री वेलणकर ; "अयोध्येचे पडछाया", "वार्षिक स्त्री उवाच १९९३" पृ.७

७५] कित्ता पृ.८

७६] डॉ.संदिप पेंडसे ; " साध्वी ऋतंभरा व जमातवाद ",
"वार्षिक स्त्री उवाच १९९३", पृ. १३ - १४

७७] कित्ता पृ.१४

७८] कित्ता पृ.१४

७९] प्रा.स.ह.देशपांडे , "सावरकर ते भाजप-हिंदुत्व विचारांचा
चिकित्सक आलेख" , पृ.२१०

८०] कित्ता पृ.२१०

८१] कित्ता पृ. २११

८२] कित्ता पृ. २११

८३] कित्ता पृ. २१२

८४] प्रा. नरेंद्र गायकवाड, "क्रांतिकारी पक्ष आणि हिंदुत्ववाद",
"सुगावा " मासिक, पृ. १

८५] कित्ता पृ.३

८६] कित्ता पृ. ३

८७] कित्ता पृ. ६

८८] कित्ता पृ.९

८९] भारतीय जनवादी आघाडी ; उपरोक्त, पृ.१९१

९०] प्रा.नलिनी पंडित ; " महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास "" पृ. १५८ - १५९

९१] किता

९२] डॉ.अरुणा टिकेकर , " या जाहिरनाम्याचा सांस्कृतिक राष्ट्रवादाशी संबंध काय ? ", दै.लोकसत्ता , २१ एप्रिल १९९६.

९३] गंगाधर इंदूरकर , उपरोक्त , पृ. ११३ - ११४

९४] गंगाधर इंदूरकर, उपरोक्त, पृ.१२०

९५] किता

९६] प्रा.स.ह.देशपांडे ,उपरोक्त, पृ.१४६

९७] गो.ग.तपस्वी, उपरोक्त , पृ.३६